रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ७२
www.ramprahar.com
शनिवार, २८ सप्टेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

रायगडात पर्जन्यमानाच्या तुलनेत १२० टक्के पाऊस/२
'संवादप्रहर'मध्ये ममता मेहता यांची मुलाखत/६
नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये रायगडच्या खेळाडूंची चमक/८

## उलवे नोडमध्ये आज महाराष्ट्राची उद्योग भरारी कार्यक्रम

**पनवेल :** गत दोन वर्षांत महाराष्ट्राने औद्योगिक क्षेत्रात साध्य केलेल्या प्रगतीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र आज भारतात पहिल्या स्थानावर आहे. महाराष्ट्राने घेतलेल्या अनेक महत्त्वाच्या निर्णयाची माहिती उद्योग जगत साकारणाऱ्या उद्योजकांना, व्यावसायिकांना व्हावी, राज्याचे व्हिजन कळावे या उद्देशाने शनिवारी (दि. २८) दुपारी २ वा. उलवे नोड, बामणडोंगरी, से. १९ येथील स्व. दि.बा.पाटील भूमिपुत्र भवन येथे 'उद्यमात सकल समृद्धी, महाराष्ट्राची उद्योग भरारी' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेष समारंभास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, उद्योगमंत्री उदय सामंत, महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, परिवहन अध्यक्ष भरत गोगावले, सिडको अध्यक्ष संजय शिरसाट, खासदार, आमदार प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

### लाडकी बहीण योजना लाभार्थी सन्मान सोहळा

# सावत्र भावांपासून सावध राहा!

## विरोधकांच्या वक्तव्यांवरून उपमुख्यमंत्री फडणवीसांचे महिलावर्गाला आवाहन

**अहमदनगर : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आम्ही योजना सुरू केल्यानंतर काही सावत्र भावांच्या पोटात दुखायला लागले. तुम्हाला त्यांच्यापासून सावध राहायला हवे, असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि. २७) महिलावर्गाला केले. त्याचवेळी खबरदार! आमच्या लाडक्या बहिणींच्या पैशांकडे नजर ठेवली, तर तुम्हाला माफ करणार नाही, असा इशाराही त्यांनी विरोधी पक्षांना दिला.

शिर्डीत आयोजित लाडकी बहीण योजना लाभार्थी सन्मान सोहळ्यात उपमुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, आमदार मोनिका राजळे, आमदार अशुतोष काळे, माजी खासदार सुजय विखे-पाटील, सदाशिव लोखंडे, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ आदी उपस्थित होते.



उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, विरोधी पक्षाचे नेते सत्तेत आले तर लाडकी बहीण योजना बंद करणार आहेत. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचे निवडणूक प्रमुख अनिल वडपल्लीवार उच्च न्यायालयात गेले व सांगितले की, लाडकी बहिणी योजना, मोफत शिक्षण योजना, पिंक रिक्षा योजना, मोफत सिलिंडरची योजना अशा योजनांमुळे पैशांचा चुराडा होतो आहे. त्यामुळे या सगळ्या योजना स्थगित करा. आम्ही मोठा वकील उभा केला व योजनांवर स्थगिती येऊ दिली नाही. (पान २ वर..)

# लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर लोकमत लोकनेता पुरस्काराने सन्मानित

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राजकारणापेक्षा समाजकारणाला अधिक महत्त्व देत जनतेने टाकलेला विश्वास सार्थ करणारे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांना गुरुवारी (दि. २६) लोकमत लोकनेता सन्मान पुरस्काराने मुंबईत गौरविण्यात आले. महाराष्ट्र राज्य विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या हस्ते त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.

या सोहळ्यास सन्माननीय अतिथी म्हणून राज्याचे वने व सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, मनसेचे नेते माजी मंत्री बाळा नांदगावकर, नितीन सरदेसाई, लोकमत मीडिया ग्रुपचे चेअरमन डॉ. विजय दर्डा, उपाध्यक्ष विजय शुक्ला, संपादक अतुल कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्रातील पनवेल हा सर्वात मोठा मतदारसंघ म्हणून गणला जातो. या मतदारसंघाचे २००९ सालापासून सक्षम लोकप्रतिनिधी म्हणून संपूर्ण जबाबदारीने आमदार प्रशांत ठाकूर कार्यरत आहेत. त्यांच्या दूरदृष्टीतून पनवेल विधानसभा क्षेत्रात विकासाचे महापर्व आले. प्रगतीपासून दूर असलेल्या पनवेलला विकासाचा चेहरा देण्याचे काम त्यांनी केले. वक्तृत्व, दातृत्व व नेतृत्व गुणसंपन्न नेता आणि समाजप्रिय व्यक्तिमत्व म्हणून आमदार प्रशांत ठाकूर यांचा पनवेलकरांना नेहमीच अभिमान राहिला आहे. नागरिकांच्या प्रश्नांची सोडवणूक करतानाच लोकांना अपेक्षित असलेला शहरासह ग्रामीण भागाचा विकास त्यांच्याकडून झाला आहे.

आमदार निधी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना, जिल्हा वार्षिक नियोजन, २५:१५ मुलभूत विकास सुविधा, आदिवासी विकास योजना अशा विविध विकासकामांच्या योजनेतून त्यांनी पनवेलचा विकास घडविला आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालय, प्रशासकीय भवन, मुंबई-पनवेलचे प्रवेशद्वार असलेले उड्डाणपूल, भुयारी गटार योजना, रस्त्यांचा विकास, नगर परिषेदचे पनवेल महापालिकेत निर्माण आणि त्या माध्यमातून मनपा हद्दीत विकास, पनवेल न्यायालय इमारतीसाठी शासनाकडून निधी, उपजिल्हा रुग्णालयामध्ये २०० खाटांचा विस्तार, प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करण्यासाठी पाठपुरावा, अमृत योजना, सामाजिक सभागृह, विसर्जन घाट, अंगणवाडी, स्मशानभूमी, गटारे, शाळा दुरूस्ती, पुल, संरक्षक भिंत, हायमास्ट, नळ पाणीपुरवठा योजना अशा अनेक विकासकामांचा झंझावात करतानाच शासनाच्या विविध योजना सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहचविण्याचे काम केले जात आहे. त्याचबरोबर श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार महाशिबिर, जयपूर फूट, खारघर मॅरेथॉन, कला, क्रीडा, नाट्य, व सांस्कृतिक महोत्सव, शालेय विद्यार्थ्यांना मोफत वह्या, उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना आर्थिक मदत असे अनेक उपक्रम गेल्या ३० वर्षांपासून सुरू असून आमदार प्रशांत ठाकूर यांचे कार्य प्रेरणादायी ठरले आहे. त्यामुळे अनेक सन्मान, बहुमान त्यांना प्राप्त झाले आहे. त्यातच लोकमतच्या वतीने त्यांना लोकनेता हा सन्मान प्रदान करण्यात आला असून त्या निमित्ताने पनवेलच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.



### सामाजिक योगदानाबद्दल कौतुक

*'लोकमत'कडून आमदार प्रशांत ठाकूर यांना दिलेल्या मानपत्रात म्हटले आहे की, समाजकारण आणि राजकारण यांची योग्य सांगड घालत आपण महामुंबईच्या प्रगतीमध्ये मोलाची भूमिका बजावत आहात. संवेदनशीलता, कठोर परिश्रम, सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून आपण करत असलेली जनसेवा ही नव्या पिढीसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे. आपल्या कार्याला मिळालेली लोकमान्यता ही आपण लोकनेता असल्याचे अधोरेखित करते. आपल्या महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल लोकमत समूहातर्फे आपणास मानपत्र देऊन सन्मानित करताना अत्यानंद होत आहे.*

## उलवे नोडमधील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात कर्मवीर जयंती सोहळा



### मान्यवरांची उपस्थिती

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३७वी जयंती उलवे नोड येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी (दि. २७) साजरी झाली. या वेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून तुम्ही माझ्यापेक्षाही मोठे देणगीदार व्हावे, असे म्हटले. (पान २ वर..)

## तळोजातील ॲडव्होकेट अकॅडमीचे आज भूमिपूजन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील तळोजा येथे साकारण्यात येणाऱ्या नियोजित ॲडव्होकेट अकॅडमी आणि रिसर्च सेंटरचे भूमिपूजन शनिवारी (दि. २८) सकाळी १० वाजता होणार आहे. त्यानंतर नवी मुंबईतील नेरूळ येथील डी.वाय. पाटील लॉ कॉलेजमध्ये उर्वरित कार्यक्रम होईल.

या कार्यक्रमास सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई, प्रसन्न वराळे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र गोव्याचे चेअरमन संग्राम देसाई, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. (पान २ वर..)


## निवडक

### पुण्यात डॉक्टरांच्या सल्ल्याने 'ते' रक्त नमुने बदलले होते!

**पुणे :** येथील पोर्शे कार अपघात प्रकरणात धक्कादायक खुलासा झाला आहे. अपघात घडला त्या रात्री अल्पवयीन आरोपीचे वडील आणि भाऊदेखील दारू प्यायलेले होते. अल्पवयीन आरोपीला वाचवण्यासाठी त्याचे रक्त नमुने बदलण्याचा घाट डॉक्टरांच्या सल्ल्याने घालण्यात आला. त्यादरम्यान ही बाब समोर आली. पुण्यामध्ये आयोजित एका जाहीर कार्यक्रमात पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी स्वतः याबाबतची माहिती दिली.

### काँग्रेस नेते, माजी मंत्री रोहिदास पाटील यांचे निधन

**धुळे :** काँग्रेसचे खान्देशमधील ज्येष्ठ नेते, माजी मंत्री रोहिदास पाटील यांचे शुक्रवारी (दि. २७) सकाळी निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, दोन मुलेग, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. कै. पाटील यांची अंत्ययात्रा शनिवारी सकाळी ११ वाजता त्यांच्या निवासस्थानापासून निघणार आहे. त्यांनी राजकीय कारकिर्दीत कृषी, महसूल, पाटबंधारे विभागाची मंत्रिपदे सांभाळली होती.



## कर्जत, माथेरानच्या अखंडित वीजपुरवठ्यासाठी आमदार निरंजन डावखरेंचा पुढाकार



### पायाभूत सुविधांची कामे वेगात करण्याचा निर्णय

**ठाणे : प्रतिनिधी**

कर्जत व माथेरान परिसरातील नागरिकांना अखंडित वीजपुरवठा सुरू राहण्यासाठी आमदार निरंजन डावखरे यांनी पुढाकार घेतला आहे. कर्जत तालुका संघर्ष समितीने सातत्याने खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याविरोधात केलेल्या आंदोलनाची दखल घेऊन आमदार डावखरे यांनी घेतलेल्या बैठकीत संघर्ष समितीच्या सर्व मागण्या मंजूर करण्यात आल्या तसेच पायाभूत सुविधांच्या कामांना अतिरिक्त निधी मिळविण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडे पाठपुरावा करण्याची ग्वाही आमदार डावखरे यांनी दिली.

कर्जत व माथेरान परिसरातील वीज समस्येबाबत आमदार निरंजन डावखरे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, राज्य वीज पारेषण कंपनीचे संचालक विश्वास पाठक यांच्यासह ऊर्जा खात्याकडे पाठपुरावा केला होता. त्यानंतर महावितरण अधिकारी व संघर्ष समितीची एकत्रितरित्या ठाण्यात बैठक झाली. (पान २ वर..)




## 'रोटरी'तर्फे पनवेलमध्ये पैठणीचे प्रदर्शन व विक्री

### वर्षा ठाकूर, शुभांगी घरत यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

थेट विणकर ते ग्राहक विक्री अंतर्गत रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलतर्फे महिलावर्गासाठी पनवेलमध्ये प्रथमच खास येवला येथील कापसे पैठणीचे भव्य प्रदर्शन व विक्रीचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवारी (दि. २७) वर्षा प्रशांत ठाकूर आणि शुभांगी महेंद्र घरत यांच्या हस्ते झाले.

या उपक्रमाला शुभेच्छा देण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर, कामगार नेते महेंद्र घरत, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेविका दर्शना भोईर, वीर वूमन्स फाउंडेशनच्या अध्यक्ष अर्चना ठाकूर, रोटरी क्लबचे मार्गदर्शक डॉ. गिरीश गुणे, रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचे अध्यक्ष शैलेश पोटे, सचिव दिपा गडगे यांच्यासह पदाधिकारी, सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पनवेलमधील गणपती मंदिर हॉल मिडलक्लास हौसिंग सोसायटी मैदानाजवळ २९ सप्टेंबरपर्यंत सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत या भव्य प्रदर्शन भरवण्यात आले आहे. या ठिकाणी ५०० रुपयांपासून ते ५० हजारांपर्यंत पैठणी विक्रीसाठी उपलब्ध आहेत तसेच येवला प्युअर पैठणी, ब्रोकेड पैठणी, सेमी पैठणी, कांजीवरम सिल्क, चंदेरी, प्युअर सिल्क, इरकली, माहेश्वरी, पैठणी ड्रेस मटेरियल, पैठणी दुपट्टा, पर्स, उपाडा व इतर अनेक साड्या आहेत.

या प्रदर्शनाचा जास्तीत जास्त महिलांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा तसेच या संदर्भात अधिक माहितीसाठी भ्रमणध्वनी ९३२२१११११५, ९८२००४४७४२ किंवा ९८२०९५६५५४ येथे संपर्क साधावा, असे आवाहन रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचे अध्यक्ष शैलेश पोटे यांनी केले आहे.

# रायगडात वार्षिक पर्जन्यमानाच्या तुलनेत १२० टक्के पाऊस

## परतीच्या पावसामुळे धरणांमधील पाणीसाठा वाढला

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात यावर्षी सरसरी पर्जन्यमानाच्या तुलनेत शुक्रवारपर्यंत (दि. २७) १२० टक्के पावसाची नोंद झाली आहे. रायगड जिल्ह्याचे वार्षिक पर्जन्यमान सरासरी तीन हजार १०१ मिलीमीटर आहे.

यावर्षी २७ सप्टेंबरपर्यंत सरासरी तीन हजार ७४९ मिलीमीटर पाऊस नोंदवला गेला आहे. यंदा पाऊस चांगला पडल्यामुळे धरणामध्ये पाणीसाठादेखील मुबलक आहे. जून महिन्याचे सरासरी पर्जन्यमान ६४३ मिमी. आहे. त्यातुलनेत यंदा ६२१ मिमी. पाऊस पडला. जुलै महिन्याचे वार्षिक पर्जन्यमान एक हजार १५९ मिमी. आहे. त्या तुलनेत यंदा सरासरी एक हजार ९७८ मिमी. पावसाची नोंद झाली आहे. ऑगस्ट महिन्यात सरासरी ८७४ मिमी. पाऊस पडतो, पण यंदा सरासरी ६९९ मिमी. पाऊस पडला, सप्टेंबर महिन्याचे सरासरी पर्जन्यमान ३८६ मिमी आहे. त्या तुलनेत यंदा २७ सप्टेंबरपर्यंत ४५१ मिलीमीटर पाऊस नोंदवला गेला आहे.



माणगाव वगळता इतर सर्व तालुक्यांमध्ये सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडला आहे. माणगावात ९८ टक्के पडला आहे. येत्या दोन दिवसांमध्ये माणगाव तालुक्यातदेखील पाऊस सरासरी ओलांडेल. माथेरान येथे विक्रमी १९० टक्के पावसाची नोंद झाली आहे. माथेरान येथे सरासरी तीन हजार ३८ मिमी. पाऊस पडतो तिथे यंदा सरासरी पाच हजार ७९४ मिमी. पाऊस नोंदवला गेला आहे.

जून आणि ऑगस्ट महिन्यात सरासरीच्या तुलनेत कमी पाऊस पडला आहे, तर जुलै आणि सप्टेंबर महिन्यात सरासरीच्या तुलनेत जास्त पावसाची नोंद झाली आहे.

परतीच्या पावसामुळे धरणांमधील पाणीसाठा वाढला आहे. यंदा पर्जन्यमान चांगले असल्याने धरणामध्ये मुबलक पाणीसाठा आहे.

### तालुकानिहाय पावसाची टक्केवारी

**अलिबाग १३५ टक्के, पेण १२४ टक्के, मुरूड १२० टक्के, पनवेल १२७ टक्के, उरण १३७ टक्के, कर्जत १२४ टक्के, खालापूर १११ टक्के, माणगाव ९८ टक्के, रोहा ११० टक्के, सुधागड १०८ टक्के, तळा ११८ टक्के, महाड ११० टक्के, पोलादपूर ११७ टक्के, म्हसळा ११० टक्के, श्रीवर्धन १०६ टक्के, माथेरान १९० टक्के.**

# युवकाचा चाकूने स्वत:वरच वार

## पनवेल शहर पोलीस नातेवाईकांच्या शोधात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरात शुक्रवारी (दि.२७) सकाळी अज्ञात युवकाने अज्ञात कारणावरून चाकूने स्वतःच्या गळ्यावर वार करून घेतला.

या घटनेची माहिती मिळताच, पनवेल शहर पोलिसांनी तरुणाला एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे दाखल केले आहे. या मुलाची अद्याप ओळख पटली नसल्याने तसेच तो बोलण्याच्या स्थितीत नसल्याने त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

पनवेल शहर पोलीस ठाण्यात अंमलदार कर्तव्यावर पोलीस उपनिरीक्षक प्रियांका शिंदे या असताना, शहरातील गुन्हे शाखा कक्ष-२ समोर एका युवकाने चाकूच्या सहाय्याने स्वतःच्या गळ्यावर वार केला असून तो गंभीर जखमी आहे, अशी माहिती मिळाली. त्यांनी तत्काळ बीट मार्शल-२ यांना पाचारण करून जखमी युवकास उपजिल्हा रुग्णालय येथे दाखल केले.

तेथे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याच्यावर प्राथमिक उपचार करून त्यास एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे पाठविले. जखमी युवक हा काहीतरी नशा केल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले आहे, तसेच त्याचे गळ्यावर वार असल्याने तो जबाब देण्याच्या स्थितीत नाही. त्यामुळे त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

यासंदर्भात कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी (२७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक प्रियांका शिंदे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पेणमधील शाळांना ई-लर्निंग साहित्य वाटप

## आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांचा पुढाकार



**पेण : प्रतिनिधी**

कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या स्थानिक आमदार विकास निधीतून पेणमधील शाळांना ई-लर्निंग शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

या वेळ भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मंगेश नेने, जगदीश कोकाटे, मनोज म्हात्रे, अनिल पाटील सर, बाळू पाटील, विवेक पाटील, जोशी मॅडम आदी उपस्थित होते.

या वेळी आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी, या साहित्याचा उपयोग विद्यार्थ्यांना गुणवत्ता वाढीसाठी होणार असून शिक्षकांना सहज व सुलभतेने विद्यार्थ्यांना प्रभावीपणे शिकवून ज्ञानदानाचे पवित्र कार्य करता येणार आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार प्रत्येक शाळेला साहित्याची गरज असून माझ्या दीड वर्षाच्या आमदारकीच्या कारकिर्दीत सुमारे दोन हजार शाळांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. पहिल्या टप्प्यात माध्यमिक शाळांना साहित्य वाटप करण्यात येत असून इंग्रजी माध्यमिक शाळांनाही सीएसआर फंडातून साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी सांगितले. तालुक्यातील जवळपास १५ शाळांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

# बेलापूर येथे उद्या युवा कार्य प्रशिक्षण रोजगार मेळावा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेंतर्गत शासकीय आद्योगिक प्रशिक्षण संस्था बेलापूर येथे सोमवारी (दि.३०) मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत निवड झालेल्या प्रशिक्षणर्थ्यांना शैक्षणिक आर्हतेप्रमाणे शासनामार्फत विद्यावेतन अदा केले जाणार आहे.

१२वी उत्तीर्ण शैक्षणिक आर्हतेसाठी प्रतिमहा विद्यावेतन रु. सहा हजार, आयटीआय/पदविका शैक्षणिक आर्हतेसाठी प्रतिमहा विद्यावेतन रु.आठ हजार, पदवीधर/पदव्युत्तर शैक्षणिक अर्हतेसाठी प्रतिमहा विद्यावेतन रु.१० हजार असे आहे. शैक्षणिक आहर्ता प्राप्त असलेल्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सदरील मेळाव्यात उपस्थित रहावे तसेच लिंकवरून आपली उमेदवारी निश्चित करावी, असे आवाहन बेलापूर येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य स. ज. पाटील यांनी केले आहे.

या उपक्रमांतर्गत तयार केलेल्या https://www.rojgar. mahaswayam.gov.in या संकेतस्थळाच्या माध्यमातून रोजगार इच्छुक उमेदवार आणि रोजगार उपलब्ध करून देणारे उद्योजक जोडले जातील, अशी माहिती बेलापूर येथील औद्योर्गिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्यांनी दिली आहे.

उमेदवारांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव प्रशिक्षणातून मिळून त्यांची क्षमता वाढविण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजक्ता व नावीन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे योजना राबवली जात आहे.

# पेणमध्ये अल्पवयीन मुलीवर अत्याचार; आरोपी अटकेत

**पेण** : पेणमधील मोतीराम तलाव परिसरात अल्पवयीन मुलीवर वारंवार अत्याचार केल्याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

फिर्यादींची मुलगी ही अल्पवयीन आहे हे माहित असूनसुद्धा आरोपीने १ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीत मोतीराम तलाव परिसरात नेऊन तिच्यासोबत वारंवार जबरदस्तीने शरीरसंबंध ठेवून तिला गरोदर केले. याप्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस मंगळवारी (दि.२४) अटक करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस शिपाई शिल्पा वेंगुर्लेकर करीत आहेत.

# माणगाव नगराध्यक्षपदी शिवसेनेच्या शर्मिला सुर्वे बिनविरोध

## उपनगराध्यक्षपदी राष्ट्रवादीच्या हर्षदा सोंडकर; औपचारिक घोषणा बाकी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगराध्यक्षपदासाठी शिवसेना नगरसेविका शर्मिला शोभन सुर्वे तर उपनगराध्यक्षपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेविका हर्षदा सतिष सोंडकर यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली आहे.





या निवडणुकीचे पीठासन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डॉ.संदीपान सानप ४ ऑक्टोबर रोजी विशेष सभेत अधिकृत घोषणा करणार आहेत.

माणगाव नगरपंचायतीवर महायुतीचे वर्चस्व आहे. नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार व उपनगराध्यक्ष राजेश मेहता यांनी आपल्या पदांचा ठरल्याप्रमाणे कार्यकाळ पूर्ण झाल्यावर या पदाचा राजीनामा दिला होता. या रिक्त झालेल्या पदांसाठी येत्या ४ ऑक्टोबर रोजी निवडणूक होत असून त्याकरिता नामनिर्देशन अर्ज भरण्याच्या दिवशी शुक्रवारी नगराध्यक्षपदासाठी शिवसेनेच्या नगरसेविका शर्मिला सुर्वे तर उपनगराध्यक्षपदासाठी राष्ट्रवादीच्या नगरसेविका हर्षदा सोंडकर यांनी आपला अर्ज दाखल केला. या दोन्ही पदांसाठी प्रत्येकी एक अर्ज प्राप्त झाल्याने निवडणूक बिनविरोध झाली.

शिवसेनेचे राज्य प्रवक्ते अ‍ॅड. राजीव साबळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे दक्षिण रायगड जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, दक्षिण रायगड भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख अ‍ॅड. महेंद्र मानकर, राष्ट्रवादी शहराध्यक्ष नितीन वाढवळ, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, दिलीप जाधव, राजेश मेहता, सचिन बोंबले, उणेगाव माजी सरपंच राजेंद्र शिर्के, शहरप्रमुख सुनील पवार, नगरसेवक दिनेश रातवडकर, नगरपंचायतीच्या महिला व बालकल्याण समिती सभापती सुविधा खैरे, नगरसेविका नंदिनी बामगुडे, रिया उभारे, ममता थोरे, लक्ष्मी हिलम, स्वीकृत नगरसेवक मनोज पवार, माजी नगरसेवक सिराज परदेशी, नितीन बामगुडे, युवा नेते सुमित काळे, साहिल गायकवाड, राजेंद्र सुर्वे, प्रभाकर मसुरे, शेखर गोडबोले आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

पान १ वरुन

## सावत्र भावांपासून सावध राहा!

सावत्र भावांची नियत बघा. कालपरवा आदित्य ठाकरे म्हणाले, आमचे सरकार येऊ द्या, महायुतीच्या सरकारने घेतलेले सर्व निर्णय आम्ही रद्द करून टाकू. म्हणजे यांच्या डोक्यात सरकार आल्यावर लाडकी बहीण योजना बंद करायाचा विचार आहे. काँग्रेसच्या प्रणिती शिंदे म्हणाल्या, लाडकी बहीण योजना म्हणजे बहिणींना दिलेली लाच आहे. अरे काही बोलताना शरम करा. हा पैसा कोणाच्या बापाचा पैसा नाही, सरकारचा पैसा म्हणजे जनतेचा पैसा आहे. त्यांचेच पैसे आम्ही बहिणींच्या खात्यात टाकतोय तर आमच्या बहिणींना लाचखोर म्हणायचा अधिकार आहे का? असा सवाल उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी केला.

विरोधी पक्षातील एक नेते म्हणाले, पंधराशे रुपयांत काय होतं? पण तुम्ही चाळीस वर्षे राज्य केलं. फुटकी कवडी तरी बहिणींना दिली का? या लोकांना पंधराशे रुपयांचे मोल समजू शकत नाही. लाडकी बहीण योजना सुरू करण्याचा निर्णय घेतल्यानंतर विरोधी पक्षाचे नेते उभा राहून म्हणायचे फसवणूक केली जातेय, पैसे देता येणार नाही, पैसे पोहचणार नाही, हे खोटं बोलत आहेत, ही लाच आहे, परंतु आज राज्यातील एक कोटी ९० लाख महिलांच्या खात्यात पैसे पोहचले, असेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी ठणकावून सांगितले.

## उलवे नोडमधील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात कर्मवीर जयंती सोहळा

सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल सीबीएससी आणि मराठी माध्यमाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कर्मवीर जयंतीच्या कार्यक्रमाला क्राईम ब्रांचचे महेश पाटील, संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, विद्यालयाचे चेअरमन परेश ठाकूर, पनवेल पं.स.च्या माजी सदस्य रत्नप्रभा घरत, युवा नेते निलेश खारकर यांच्यासह शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रयत शिक्षण संस्थेला दिलेल्या अभूतपूर्व देणगी आणि सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दोन्ही माध्यमांच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या वेळी परेश ठाकूर आणि वाय.टी. देशमुख यांनी कर्मवीरांचे खरे वारसदार म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे शब्दसुमनांनी कौतुक केले.

## तळोजातील अ‍ॅडव्होकेट अकॅडमीचे आज भूमिपूजन

नियोजित अकॅडमी व रिसर्च सेंटरमध्ये सर्व वकिलांना त्यांच्या व्यवसायाच्या दृष्टिकोनातून उपयुक्त ठरणार आहे. या अकॅडमीला छत्रपती शिवाजी महाराज अकॅडमी हे नाव देण्यात यावे हा प्रस्ताव बार कौन्सल ऑफ महाराष्ट्र आणि गोव्याचे माजी चेअरमन आणि विद्यमान सदस्य पारिजात पांडे यांनी दिलेला आहे. भूमिपूजन समारंभास वकीलवर्गाने आवर्जून हजर राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या समारंभासाठी जिल्हा सरकारी वकील व रायगड जिल्हा अधिवक्ता परिषदेचे अध्यक्ष संतोष पवार, पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष व रायगड अधिवक्ता परिषदेचे उपाध्यक्ष मनोज भुजबळ, परिषदेचे जिल्हा महामंत्री सुनील तेलगे, पनवेल अध्यक्ष राजेंद्र देशमुख आदी विशेष मेहनत घेत आहेत.

## कर्जत, माथेरानच्या अखंडित वीजपुरवठ्यासाठी आमदार निरंजन डावखरेंचा पुढाकार

या बैठकीला महावितरणच्या पेण मंडळाचे अधीक्षक अभियंता राजाराम माने, कार्यकारी अभियंता विद्यानंद शिंदे, कर्जत उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता चंद्रकांत केंद्रे, भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस दीपक बेहरे, कर्जत तालुकाध्यक्ष राजेश भगत, कर्जत वीज ग्राहक संघर्ष समितीचे संयोजक कैलास मोरे, सदस्य रंजन दातार आदी उपस्थित होते. या बैठकीत वीज वितरणाच्या पायाभूत सुविधा उभारण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. त्यानंतर केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून पायाभूत सुविधांसाठी लागणाऱ्या निधीबाबत केंद्र व राज्य सरकारकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन आमदार डावखरे यांनी दिले.

कर्जत व माथेरान शहरासाठी स्वतंत्रपणे एक्सप्रेस फीडर कार्यरत असून वीजपुरवठा सलग सुरू राहण्यासाठी उपाययोजना केल्या जातील. शिरसे येथे वीज उपकेंद्राचे कामे वेगाने पूर्ण केले जाईल. वाढत्या वीज मागणीनुसार ट्रान्सफॉर्मर उभारण्याच्या मागणीला प्राधान्य दिले जाईल. कर्जत शहर आणि नेरळ ते माथेरानपर्यंत वीज वाहिन्या भूमिगत करण्यासाठी निधी मंजूर केला जाईल. केंद्र सरकारच्या आरडीएसएस योजनेतून पायाभूत सुविधांची कामे सुरू असून आणखी दोन इनकमर बसविण्याचे काम सुरू आहे, तर ४१ नवे ट्रान्सफॉर्मर व १०२ ट्रान्सफॉर्मरच्या क्षमतेत वाढ केली जाईल, अशी माहिती बैठकीत देण्यात आली. त्याचबरोबर ग्राहक तक्रार निवारण शिबिर रविवारी आयोजित करण्यासाठी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी संमती दिली.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात पदभार सोहळा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये शुक्रवारी (दि.२७) विद्यार्थ्यांच्या पदभार सोहळ्याचे (Investiture Ceremony) आयोजन करण्यात आले होते.

या सोहळ्यादरम्यान विद्यार्थ्यांना विविध नेतृत्व पदांचा सन्मानपूर्वक भार दिला गेला. या कार्यक्रमात प्रमुख अतिथींच्या हस्ते विद्यार्थ्यांना सॅश प्रदान करण्यात आले. पदभार ग्रहण केलेल्या विद्यार्थ्यांनी विद्यालयाच्या नियमांचे पालन करीत आपले कर्तव्य चोख पार पाडण्याचे वचन दिले. प्रमुख पाहुण्यांनी तसेच प्राचार्या निशा नायर यांनी विद्यार्थ्यांना त्यांची जबाबदारी कशी पार पाडावी यावर मार्गदर्शन केले.

पदभार ग्रहण सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी, विद्यालयाच्या सखी कमिटी मेंबर, वुमन विंगचे अध्यक्ष साधना पवार आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाच्या शिक्षिका खुशबू भोसले आणि आलिया ठाकूर यांनी केले.



## दुखवटा

### दगडू भगत



**धाटाव** : बोरघर गावातील दगडू जानु भगत यांचे अल्पशा आजाराने मंगळवारी (दि. १७) निधन झाले. मृत्यूसमयी ते ७५ वर्षांचे होते. त्याच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, तीन मुली, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी गुरुवारी (दि.२६) महादेव मंदिर येथे तर उत्तरकार्य रविवारी (दि. २९) राहत्या घरी होणार आहे, अशी माहिती भगत परिवाराने दिली.

### हभप रामचंद्र पडवळ

**मोहोपाडा** : बारवई येथील हभप रामचंद्र बाळू पडवळ यांचे निधन झाले. मृत्यूसमयी ते ९७ वर्षांचे होते. परिसरातील भजन, किर्तन सप्ताहात त्यांचा मोठा सहभाग असायचा. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे, मुली असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी २ ऑक्टोबर रोजी श्रीक्षेत्र उद्धर रामेश्वर येथे तर उत्तरकार्य ५ ऑक्टोबर रोजी बारवई येथील राहत्या घरी होणार आहेत. यावेळी सकाळी हभप हरिश्चंद महाराज जाधव यांचे प्रवचन होईल. त्यांच्या निधनाने परिवारावर शोककळा पसरली आहे.



## निवडक

### लोहार समाज उरण कार्यकारिणी जाहीर



**उरण :** हिंदू लोहार समाज महासंघाच्या वतीने मंगळवारी हनुमान मंदिर वेश्वी येथे नवनिर्वाचित उरण तालुका कार्यकारी मंडळ नियुक्त करण्यात आले. अध्यक्षपदी कृष्णा व्यापारी, उपाध्यक्षपदी अनंता जोशी, अमोल कोशे, कार्याध्यक्षपदी संतोष जाधव, सचिवपदी दिनेश पवार, खजिनदारपदी दिपक खंडागळे, महिला सदस्य सोनाली जाधव, निकिता मने, विधी सल्लागार पूर्वी कोशे यांची निवड करण्यात आली. कार्यक्रमास महासंघाचे अध्यक्ष आण्णासाहेब जोशी, उपाध्यक्ष रामनाथ मोरे, महासचिव बळीराम खरे, खजिनदार दिलीप जोशी, कार्यकारी सदस्य चंद्रकांत लोखंडे, विजय भागवत, महिला आघाडी प्रमुख मीना कदम, ठाणे जिल्हाध्यक्ष यशवंत व्यापारी, रायगड जिल्हा अध्यक्ष अरुण जोशी, रायगड उपाध्यक्ष मंगेश कदम आदी उपस्थित होते.

### मोहोपाड्यात नेत्र तपासणी शिबिर



**मोहोपाडा** : रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा आणि आर सुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने मोहोपाडा येथे शुक्रवारी (दि.२७) मोफत नेत्र तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रीया शिबिर झाले. या शिबिराचा ५२ रुग्णांनी लाभ घेतला, यातील २० रुग्णांना मोतिबिंदूचा आजार असल्याचे दिसून आले. त्यांच्यावर मोतिबिंदू शस्त्रक्रीया करण्यात आली. या वेळी आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलचे डॉ. अश्विन पवार, डॉ.प्रकाश पाटील यांनी रुग्णांना मार्गदर्शन केले. या वेळी सरपंच उमा मुंढे, रोटरी क्लबचे अध्यक्ष सचिन थोरात, सचिव ऋतुजा भोसले, रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष गणेश काळे, देवेंद्र महिंद्रकर, गणेश म्हात्रे, अमित शहा, आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलचे टिम मॅनेजर विजय बामणे, नेहा कदम, नेत्रा महाडिक आदी उपस्थित होते.

### लेखक अनिल दाभाडे यांना पुरस्कार



**मोहोपाडा** : रसायनी परिसरातील कवी, लेखक, चारोळीकार अनिल दाभाडे यांना काव्यसम्राट २०२४ हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद धुळे, जिल्हा साहित्य समुहाने राज्यस्तरीय काव्यलेखन स्पर्धा आयोजित केली होती. या राज्यस्तरीय काव्यलेखन स्पर्धेत उत्कृष्ट काव्यलेखन केल्याबद्दल त्यांना गौरविण्यात आले. याबद्दल राष्ट्रीय अध्यक्ष शरद गोरे, उपाध्यक्ष शुभांगी काळभोर, कार्याध्यक्ष धुळे हिरामण सोनवणे आदींनी अनिल दाभाडे यांचे अभिनंदन केले आहे.

# लग्नाचे आमिष दाखवून इंजिनियर तरुणीला गंडा

## २.४७ लाख रुपये उकळून फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

लग्न जुळविणाऱ्या साईटवर स्वत:साठी वर शोधण्याच्या प्रयत्नात असलेल्या इंजिनियर तरुणीला ठकसेनाने लग्नाचे आमिष दाखवून तिच्याकडून २.४७ लाख रुपये उकळून तिची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

शशीधर दिलीपकुमार जेरे (३३) असे या भामट्याचे नाव असून खारघर पोलिसांनी त्याच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. या ठकसेनाने लग्न जुळविणाऱ्या साईटवर वेगवेगळ्या नावाने अकाऊंट तयार करून अनेक तरुणींची फसवणूक केल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

या प्रकरणात फसवणूक झालेली ३२ वर्षीय तरुणी खारघर येथे राहण्यास असून ती इंजिनियर म्हणून कामाला आहे. या तरुणीने २०२१मध्ये लग्न जुळविणाऱ्या साईटवर लग्नासाठी आपले नाव नोंदवले होते. एप्रिल २०२४मध्ये शशीधर दिलीपकुमार जेरे या ठकसेनाने तरुणीची वाशी येथे भेट घेतली. त्याने त्याचे बँगलोर येथे एमएस आणि इंजिनियरींगचे शिक्षण झाल्याचे तसेच तो टॉरी हॅरिस कंपनीत काम करीत असल्याचे सांगितले, तसेच त्याचा हॉटेलचा बिझनेस असल्याचे सांगून तक्रारदार तरुणीवर छाप पाडली. या ठकसेनाने या तरुणीची अनेकवेळा भेट घेतली.

यादरम्यान त्याने बिझनेससाठी चार ते पाच लाखांची आर्थिक मदत हवी असल्याचे सांगून ते पैसे तिला काही दिवसांत परत करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे तरुणीने प्रथम ८० हजार आणि नंतर एफडी मोडून ९० हजार रुपये शशीधर याला दिले, तसेच शशीधरने क्लाऊडचे पेमेंट करण्याच्या बहाण्याने तरुणीच्या क्रेडीट कार्डवरुन ७७ हजार रुपये घेतले. त्यानंतर त्याने या तरुणीला २० लाख रुपयांचे कर्ज घेण्याससुद्धा सुचवले, मात्र तरुणीने त्याला नकार दिला. यादरम्यान तरुणीने पैसे परत मागण्यासाठी त्याला संपर्क साधण्यास सुरुवात केल्यानंतर त्याने तिला टाळण्यास सुरुवात केली.

शशीधर याने तरुणीचे फोन आणि मेसेजला प्रतिसाद देणे बंद केल्यानंतर तरुणीला त्याच्यावर संशय आला. त्यामुळे तरुणीने शशीधरबाबत माहिती घेतली असता, त्याच्याविरोधात कर्नाटक राज्यात २०२०मध्ये बलात्कार आणि फसवणुकीचे गुन्हे दाखल असल्याची माहिती तिला मिळाली, तसेच शशीधरने लग्न जुळविणाऱ्या साईटवर वेगवेगळ्या नावाने अकाऊंट तयार केल्याचेसुद्धा तिला समजले. त्यानंतर तिने खारघर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली.

# घटस्फोटासाठी मदत करण्याच्या बहाण्याने विवाहितेवर बलात्कार

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल भागात राहणाऱ्या तरुणाने पतीपासून विभक्त झालेल्या महिलेला घटस्फोट घेऊन देण्यास मदत करण्याचे तसेच तिच्यासोबत लग्न करून तिच्या मुलांचा सांभाळ करण्याचे आश्वासन देऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे.

सुमित सुभाष पांचाळ (२८) असे या तरुणाचे नाव असून खांदेश्वर पोलिसांनी त्याच्याविरोधात लग्नाचे आमिष दाखवून बलात्कार केल्याप्रकरणी त्याला अटक केली आहे.

या प्रकरणातील पीडित महिला नवीन पनवेल भागात राहण्यास आहे, तर तिच्यावर लैंगिक अत्याचार करणारा आरोपी सुमित पांचाळ मूळचा चिपळूण येथील आहे. वर्षभरापूर्वी सुमित पांचाळ याची पतीपासून विभक्त राहात असलेल्या पीडित महिलेसोबत ओळख झाली होती. या ओळखीचे रुपांतर प्रेमात झाल्यानंतर सुमितने तिला तिच्या पतीपासून घटस्फोट घेऊन देण्यास मदत करून तिच्यासोबत लग्न करून तिच्या मुलांचा सांभाळ करण्याचे आश्वासन दिले हेते.

त्यानंतर त्याने पीडित महिलेसोबत तिच्या नवीन पनवेल येथील घरामध्ये अनेकवेळा शरीरसंबंध प्रस्थापित केले, मात्र त्यानंतर सुमितने महिलेसोबत लग्न करण्यास नकार देऊन तिला टाळण्यास सुरुवात केली.

तिने खांदेश्वर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी सुमित पांचाळ याच्याविरोधात गुन्हा दाखल करीत त्याला अटक केली आहे.

# पनवेलमध्ये स्वच्छ भारत फेस्ट

## सफाई कर्मचाऱ्यांसाठी नाट्यप्रयोग





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वच्छ भारत अभियानाच्या १०व्या वर्धापन दिनानिमित्त महापालिकेच्या वतीने स्वच्छ भारत फेस्टचे गुरुवारी (दि.२६)आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजन करण्यात आले.

या वेळी घनकचरा व स्वच्छता विभागाचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, विभाग प्रमुख अनिल कोकरे, मुख्य आरोग्य निरीक्षक, सर्व आरोग्य निरीक्षक, सर्व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता या संकल्पनेसह स्वच्छता ही सेवा मोहिमेस महापालिका कार्यक्षेत्रात चारही प्रभागात उत्साहात सुरुवात झाली आहे. या अंतर्गत घनकचरा व स्वच्छता विभागातील सर्व सफाई कर्मचाऱ्यांसाठी स्वच्छ भारत फेस्टचे आयोजन करण्यात आले. स्वच्छतेचा संदेश प्रसारित करण्याकरिता सफाई मित्र व त्यांच्या कुटुंबियांकरिता लेखक व दिग्दर्शक उर्मी यांचे जहाँ के अंधे रास्ते या प्रबोधनात्मक नाटकाचे विशेष सादरीकरण करण्यात आले. याबरोबरच सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये सफाई कर्मचाऱ्यांनी गायन, वादन, नृत्य अशा आपल्या विविध कलांचे सादरीकरण केले.

# गोदी आणि बंदर कामगारांना वेतनवाढ

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

देशातील प्रमुख ११ बंदरातील गोदी आणि बंदर कामगारांच्या वेतनामध्ये भरघोस वाढ करणारा वेतन करार शुक्रवारी (दि.२७) करण्यात आला. त्यामुळे गोदी आणि बंदर कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

हा वेतन करार घडवून आणण्यामध्ये महत्त्वाची भूमिका भारतीय मजदूर महासंघाचे महामंत्री सुरेश पाटील व कामगार नेते सुधीर घरत यांनी पार पडली.

या वेळी इतर पाच फेडरेशनचे प्रमुख नेते, पी. एम. मोहम्मद हनीफ, एस. के. शेट्ये, सी. डी. नंदकुमार, नरेंद्र राव, प्रभात सामंतराय, बी. मासेन, इंडियन पोर्ट्स असोसिएशनचे चेअरमन राजीव जलोटा, मॅनेजिंग डायरेक्टर विकास नरवाल, क्षेत्रीय श्रम आयुक्त सुनील माळी यांच्या उपस्थितीत वेतन करारावर मुंबई पोर्ट प्राधिकरणाच्या प्रशासकीय कार्यालयामध्ये सह्या करण्यात आल्या. या कराराला अंतिम स्वरूप देण्यासाठी नेमलेल्या ड्राफ्टिंग समितीचे व्यवस्थापकीय सदस्य शांती मॅडम व इतर सदस्यांनी मेहनत घेतली.

प्रसंगी भारतीय पोर्ट आणि डॉक मझदूर महासंघाचे अध्यक्ष श्रीकांत राय, खजिनदार सुधीर घरत, गोपी पटनाईक, ज्ञानेश्वर सोनावणे, अनिल चिर्लेकर, दिपक जाधव, जेनपीए विश्वस्त रवींद्र पाटील, मंगेश ठाकूर आदी उपस्थित होते.

जेएनपीएसह देशातील प्रमुख ११ बंदरातील गोदी व बंदर कामगारांच्या वेतानामध्ये भरगोस वाढ झाल्याने जेएनपीए कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



# नेरे उपसरपंचपदी भाजपचे दिनेश मानकर बिनविरोध



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नेरे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भाजपचे दिनेश रमेश मानकर यांची निवड झाली आहे.

या वेळी भाजपचे तालुका उपाध्यक्ष भाजप संजय पाटील, नेरे विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, सरपंच प्रकाश घाडगे, माजी उपसरपंच नीलिमा निलेश पाटील, माजी उपसरपंच वंदना पालकर, सदस्य शैलेश जाधव, राम पाटील, कल्पना वाघे, माजी सरपंच जयंत मानकामे, माजी सदस्य एकनाथ पाटील, सुभाष पाटील, प्रदीप मानकामे, प्रमोद मानकामे, प्रसन्न मानकामे, हेमंत मानकामे, किरण मानकामे, नितेश मानकामे, निशांत मानकामे, भोपाल मानकामे, विनय मानकामे, नितीन मानकामे, पद्माकर मानकामे, निलेश पाटील, तुषार पाटील, काशिनाथ पाटील, महादू पाटील, गजानन पाटील, किशोर कन्हेरे, सदानंद मानकामे, मंदार मानकामे, प्रवीण चोणकर, संजय बाळाराम पाटील, प्रसाद चोणकर, नारायण पाटील, गोटीराम म्हात्रे, रोहिदास मानकामे, डॉ. रोशन पाटील यांनी दिनेश मानकर यांचे अभिनंदन केले.

# पनवेलमध्ये स्थलांतरीत रेशनचे दुकान पुन्हा सुरू

**पनवेल :** शहर परिसरातील रेशन धान्याची स्थलांतरीत करण्यात आलेल्या दोन दुकानांपैकी एक दुकान पुन्हा सुरू करण्यात आले आहे. यासाठी माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी पनवेल तहसीलदारांकडे पत्रव्यवहार केला होता. दुसरे दुकानही लवकरात लवकर पनवेलमध्ये सुरू करावे, अशी मागणी दर्शना भोईर यांनी आता केली आहे.

पनवेल शहरातील रेशन मिळणारे दुकान क्रमांक १५ पाण्याच्या टाकीजवळ व दुकान क्रमांक ३ गणेश मार्केटजवळ स्थलांतरीत करण्यात आलेले होते. त्यामुळे या परिसरातील सर्व सामान्य नागरिकांना रेशनचा पुरवठा व्यवस्थितरित्या होत नाही. त्यामुळे या परिसरातील सर्व सामान्य नागरिकांना रेशनचा पुरवठा व्यवस्थितरित्या होत नाही व नागरिकांना अनेकदा या ठिकाणी हेलपाटे मारावे लागतात.

यातील दुकान क्रमांक ३ गणेश मार्केटजवळ स्थलांतरीत करण्यात आलेले दुकान आता पनवेल शहरातील ५२ बंगला परिसरात करण्यात आले आहे. त्यामुळे ग्राहकांना होणारी गैरसोय दूर होणार आहे. दुकान क्रमांक १५ हेदेखील पनवेल शहरातच सुरू करण्यात यावे, अशी मागणी होत आहे.

# विद्यार्थ्यांनी जिद्द आणि चिकाटीतून यशस्वी व्हावे –लोकनेते रामशेठ ठाकूर

## गव्हाण विद्यालयात कर्मवीर जयंती सोहळा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रतिकूल परिस्थितीतूनही विद्यार्थ्यांनी जिद्द आणि चिकाटीतून परिश्रमपूर्वक अभ्यास करून यशस्वी, व्हावे, असा संदेश रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी दिला.




रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये संस्थेचे संस्थापक शिक्षण महर्षी पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३७वा जयंती सोहळा व त्यानिमित्त लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांसाठी कै.ज.आ.भगत पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात झाला. त्या वेळी ते बोलत होते. लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी संस्थेकडे ठेवलेल्या दहा लाखांच्या कायम ठेवीवरील व्याजातून आलेल्या रकमेतून गुणवंत विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके वितरीत करण्यात आली.

या समारंभास प्रमुख अतिथी म्हणून न्हावा शेवा पोलीस उपनिरीक्षक सुनील होलार, प्रमुख वक्ते म्हणून तु.ह.वाजेकर विद्यालयाच्या ज्युनिअर कॉलेजचे प्रा.दिनेश सासवडे, स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, वाय.टी. देशमुख, शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर, विश्वनाथ कोळी, गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत, न्हावेचे सरपंच विजेंद्र पाटील, न्हावे येथील न्यू इंग्लिश स्कूल स्थानिक समितीचे चेअरमन चंद्रकांत भोईर, पनवेल पं. स. माजी सदस्य रत्नप्रभा घरत, ज्येष्ठ नेते जयवंतराव देशमुख, वसंतशेठ पाटील, सी.एल. ठाकूर, आर.सी.घरत, गणेश भोईर, सुधीर ठाकूर, मदन पाटील, राजेंद्र देशमुख, रघुनाथ देशमुख, भाऊ भोईर, काशिनाथ पाटील, शिक्षक पालक संघाचे माजी उपाध्यक्ष नामदेव ठाकूर, हेमंत ठाकूर, वामन म्हात्रे, भार्गव ठाकूर, रामदास ठाकूर, सुहास भगत, शिक्षक पालक संघाचे विद्यमान उपाध्यक्ष कुंदन मोकल, गव्हाण सदस्या उषा देशमुख,कामिनी कोळी, सिंधू घरत, भाजप महिला मोर्चाच्या अध्यक्ष ॲड.योगिता भगत, उपाध्यक्ष सुजाता पाटील, वैभव घरत, अंकुश ठाकूर, पी.के.ठाकूर, व्ही. के.ठाकूर, उत्तम कोळी, काशिनाथ घरत, राम मोकल,प्राचार्या प्रणिता गोळे, रामदास ठाकूर, कांबळे गुरुजी, एन.सी.म्हात्रे, ॲड.रुपेश म्हात्रे, संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर, संस्थेचे लाईफ मेंबर रविंद्र भोईर व प्रमोद कोळी तसेच गव्हाण विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळे यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अहवाल वाचन विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे यांनी केले.

प्रमुख वक्ते प्रा. दिनेश सासवडे यांनी, कर्मवीर अण्णांच्या जीवनातील काही प्रसंग सांगत कर्मवीर अण्णांच्या तत्त्वज्ञानामुळे आणि त्यांच्या योगदानातून या महाराष्ट्र कसा घडला याचे विवेचन केले. संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, पोलीस उपनिरीक्षक सुनील होलार यांचेही समायोचित भाषण झाले. विद्यार्थी स्मित कुंदन मोकलचेही भाषण झाले.

सूत्रसंचालन विद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख एच. आर. पाटील व ज्येष्ठ शिक्षक सागरकुमार रंधवे यांनी केले, तर विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांनी आभार मानले.

संस्थेच्या रायगड विभागातून रयत ओलिंपियाड शिष्यवृत्ती प्राप्त करणाऱ्या विद्यार्थिनीचा सन्मानचिन्ह व देऊन गौरव करण्यात आला. त्याचप्रमाणे रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर पारितोषिक विद्यालयास तिसऱ्यांदा प्राप्त झाल्याबद्दल विद्यालयाचे चेअरमन, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व लाईफ मेंबर यांना गौरविण्यात आले. संस्थेचे नवनियुक्त रायगड विभागीय अधिकारी मोहनराव कोंगेरे यांनी कार्यक्रमास उपस्थिती दर्शविली दिली.

## संपादकीय

# गरज वाढीव सुसज्जतेची

जागतिक हवामानबदलामुळे गेली काही वर्षे पावसाचे स्वरूप बरेच बदलते आहे. अलीकडच्या काळात त्याची झळही सर्वदूर जाणवू लागली आहे. यंदा परतीच्या पावसाचा फटका महाराष्ट्राला बसणार याचा अंदाज हवामान विभागाने आधीच व्यक्त केला होता. बुधवारच्या पावसाने मुंबई आणि पुण्याची दैना केली हे चित्र बुधवारीच स्पष्ट झाले, पण जवळपास राज्यभरातील पिकांना या पावसाचा फटका बसल्याचे आता हळुहळू समोर येते आहे.

**नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, धुळे, चंद्रपूर, रत्नागिरी, सांगली, बुलढाणा, सातारा, गडचिरोली यांच्यासहित राज्यात बहुतेक भागांत सध्याच्या परतीच्या पावसामुळे पिकांना मोठा फटका बसला आहे. तयार पिकाचे हे नुकसान शेतकऱ्यांसाठी आणखी वेदनादायी आहे. राज्यभरातील सुमारे ३३ हजार हेक्टर क्षेत्रातील शेतीला परतीच्या पावसाचा फटका बसला आहे असे समजते. या भागांतील पंचनामे लवकरात लवकर उरकून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची गरज आहे. सोयाबिन, कांदा, बाजरी, कापूस आदी पिकांचे नुकसान झाले असून अंतिमत: याची झळ ग्राहकांनाच जाणवणार आहे हे सांगायला नको. पुण्यात परवा सप्टेंबरच्या सरासरीच्या ७२ टक्के पाऊस अवघ्या दोन तासांत कोसळला, तर मुंबईतही त्याच वेळेस अवघ्या काही तासांत अनेक ठिकाणी २०० मिमीहून अधिक पाऊस झाला. परिणामस्वरूप अनेक ठिकाणी रस्त्यांवर प्रचंड पाणी साठले. बहुतेक रस्त्यांवर नागरिकांना गुडघाभर पाण्यातून चालावे लागले. काही ठिकाणी मोटारीही पाण्याखाली गेल्या. कित्येक लोक रेल्वेस्थानकांवर, रस्त्यांवर अडकून नेहमीच्या वेळेपेक्षा चार-पास तासांनी उशिरा घरी पोहचले. या दिवशी मुंबईतील अंधेरीत रस्त्यावरील साचलेल्या पाण्यात गटारावरचे झाकण नसल्याचे लक्षात न आल्याने एक महिला त्यात पडली. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने बचावकार्य करून तिला बाहेरही काढले, पण नाकातोंडात पाणी गेल्याने अखेर इस्पितळात नेण्यापूर्वीच ती दगावली. अतिवृष्टीमुळे मुंबईत अशा स्वरूपाची दैना उडणे हे जून-जुलै महिन्यात अपेक्षित असते, मात्र आता सप्टेंबर महिन्यातील परतीचा पाऊसही नुकसानकारक ठरतो आहे, कारण अतिशय कमी काळात अतिवृष्टी हे आता पावसाचे सरसकट स्वरूप होऊ लागले आहे. पावसाचे स्वरूप हे असे बदलणार, जागतिक हवामानबदलाचे जगातील कुठल्या देशांना कशास्वरूपाचे फटके बसणार याचे सगळे तपशील गेली काही वर्षे शास्त्रज्ञ पुन्हा पुन्हा जाहीर करत आहेत. शास्त्रज्ञांच्या या इशाऱ्यांना गांभीर्याने घेऊन त्यानुसार एकंदरच सुसज्जतेत मोठे बदल करण्याची गरज आता स्पष्ट होऊ लागली आहे. शहरी भागांमध्ये त्यानुसार पर्जन्यवाहिन्यांची व्यवस्था करावी लागणार आहे. मुंबई शहरात त्यासाठीच्या मोठ्या प्रकल्पाचे कामही सुरू आहे, परंतु तो प्रकल्प पूर्ण होण्याच्या आधीच पावसाचे स्वरूप झपाट्याने बदलून या प्रकल्पाची गरज आणखी अधोरेखित झाली आहे. इतर मोठ्या शहरांनाही अशा प्रकल्पांची गरज भासू शकेल हे लक्षात घेऊन त्या दृष्टीने आतापासून उपाययोजना व्हायला हवी. शेती व धरणाच्या पाण्याचे नियोजन या दोन्ही बाबतीतही यापुढे अधिक गांभीर्याने वेगळ्या स्वरूपाच्या नियोजनाकडे वळावे लागणार आहे. शेतकऱ्यांना शेतीची नवी नियोजनपद्धती समजावूनही सांगावी लागेल. शाळांनाही कदाचित विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पावसाळ्याच्या काळात प्रसंगी 'ऑनलाइन'कडे वळण्याची लवचिकता राखावी लागेल. अनेक कार्यालयांनीही त्या दृष्टीने तयारी ठेवल्यास एकंदर वाहतूक व्यवस्थांवर अकस्मात निर्माण होणारा ताण टाळता येऊ शकेल. पावसाच्या स्वरूपातील बदल पाहता आपली सुसज्जता आपल्याला मोठ्या स्वरूपात बदलावी लागणार एवढे मात्र निश्चित.**

# नको चिंता उपचाराच्या खर्चाची, मदत आहे शासनाची!

राज्य शासनाने जनसामान्यांच्या आरोग्य जपण्याला प्रथम प्राधान्य दिले आहे. राज्यातील आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यासाठी विविध निर्णय घेण्यात आले आहे. या निर्णयांमध्ये उपचाराचा खर्च न पेलणाऱ्या नागरिकांना केंद्रिभूत केले आहे. यामुळे जनसामान्यांना दिलासा मिळाला आहे. याशिवाय नियमित आरोग्य तपासणी करण्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबविला आहे. समाजातील प्रत्येक घटकाची आरोग्य तपासणी करण्यासाठी अभियान शासन राबवित आहे. राज्याची महत्त्वाची योजना असलेल्या महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्याची प्रतिकुटूंब वार्षिक मर्यादा वाढविण्यात आली आहे. या निर्णयांमुळे आज कुठलाही मोठा आजार झाल्यास उपचार करण्याची चिंता नाही.

महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेचे विमा संरक्षण दीड लाखांहून पाच लाख रुपये करण्यात आले आहे. सर्वसामान्यांना खासगी दवाखान्यातील लाख रुपयांची बिले अदा करण्यापेक्षा योजनेच्या माध्यमातून पाच लाख रुपयांपर्यंत उपचार मिळत आहे. तालुका स्तरावरील रूग्णालयेही आता या योजनेचा लाभ रुग्णांना देत आहेत. महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना व आयुष्यमान भारत, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना या एकत्रित योजनेतंर्गत लाखो रूग्णांवर शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या आहेत. कर्नाटक सीमा भागात ८६५ गावांमध्ये मराठी भाषिकांना ही योजना लागू करण्यात आली आहे. या भागातील गरजू रुग्णांना योजनेच्या माध्यमातून लाभ देण्यात येत आहे. तसेच मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रिया याचा लाभही अडीच लाखांवरून चार लाखांपर्यंत नेण्यात आला आहे. त्यामुळे या संदर्भात जे कोणी लाभ घेऊ इच्छित असतील किंवा जे प्रतीक्षेत आहेत, त्यांना या योजनेचा लाभ होत आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाने प्रत्येक घरात माता सुरक्षित-तर घर सुरक्षित ही अभिनव मोहीम राबविली. या मोहिमेदरम्यान महिलांना तपासणीसाठी नेण्याकरिता तसेच औषधांसाठी प्रति जिल्हा दोन कोटींचा निधी देण्यात आला. या मोहिमेतून दुर्धर आजारांचे निदान झालेल्या महिलांना उपचारासाठी मदत करण्यात आली. वैद्यकीय अधिकारी आणि स्त्रीरोगतज्ज्ञामार्फत तपासणी, औषधोपचार, सोनोग्राफी आणि समुपदेशन करण्यासाठी मेडिकल, डेंटल शिबिरे आयोजित करण्यात आली. विविध आजाराशी संबंधित तज्ज्ञांचेदेखील सहकार्य घेण्यात आले.

आशा, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेविका, सेवक यांच्यामार्फत घरोघरी जाऊन उपलब्ध सुविधेबाबत माहिती देण्यात येतो. महिलांमधील कर्करोग, मधुमेह, उच्च रक्तदाब, मोतीबिंदू, कान नाक घसा व इतर आजारांचे निदान व आवश्यकतेनुसार उपचार व समुपदेशन करण्यात आले. राज्यात चार कोटी ३९ लाख २४ हजार १०० महिलांची आरोग्य तपासणी तसेच दुसऱ्या टप्प्यात तीन लाख १३ हजार ९६५ गर्भवती मातांवर उपचार करण्यात आले आहेत.

राज्यभरात ० ते १८ वर्षांपर्यंतची बालके, किशोरवयीन मुला-मुलींच्या सर्वांगीण आरोग्य तपासणीसाठी जागरूक पालक, सुदृढ बालक हे अभियान राज्यभर राबविण्यात आले आहे. या अभियानांतर्गत राज्यातील सुमारे १८०० शाळांमधील १८ वर्षांखालील जवळपास दोन कोटी ४९ लाख ५४ हजार २५७ मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे. राज्यात नऊ हजार तपासणी पथकांमार्फत ही अभिनव योजना राबविली आहे.

मुला-मुलींच्या सर्वांगिण आरोग्य तपासणीसाठी सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, एकात्मिक बाल विकास विभाग, आदिवासी विभाग व समाजकल्याण विभाग यांच्या समन्वयाने हे अभियान राज्यभर राबविण्यात आले. ही तपासणी शासकीय निमशासकीय शाळा व कनिष्ठ महाविद्यालये, खासगी शाळा, आश्रमशाळा, अंधशाळा, दिव्यांग शाळा, अंगणवाडया, खासगी नर्सरी, बालवाड्या, बालगृहे, बालसुधारगृहे, अनाथआश्रम, समाज कल्याण व आदिवासी विभाग वसतीगृहे या ठिकाणी करण्यात आली. महिला, बालकांसोबतच पुरुषांचीसुद्धा सर्वांगीण आरोग्य तपासणी करण्यात आली. यासाठी निरोगी आरोग्य तरुणाईचे, वैभव महाराष्ट्राचे ही मोहीम राबविण्यात आली. या अभियानांतर्गत १८ वर्षांवरील सुमारे तीन कोटींपेक्षा अधिक पुरुषांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे.

या विभागाचा जनमानसात लोकप्रिय आणि कल्याणकारी निर्णय म्हणजे हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना होय. या निर्णयामुळे आरोग्य सुविधांचे जाळे अधिक बळकट झाले. सामान्य नागरिकांना अगदी सहज आरोग्य सुविधा मिळू लागल्या. गल्ली बोळात हे दवाखाने सुरू झाल्यामुळे हाकेच्या अंतरावर आरोग्य सुविधांची उपलब्धता झाली. सुरूवातीला मुंबई शहरात सुरू केलेल्या दवाखान्यांना वाढता प्रतिसाद बघता राज्यभरात दवाखाने सुरू करण्यात आले असून राज्यात ३४७ आपला दवाखाना सुरू आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्थ असलेल्या सर्व रुग्णालयांमध्ये रुग्णांना देण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या वैद्यकीय सेवा नि:शुल्क उपलब्ध करून देण्यात येत आहे. या निर्णयाची अंमलबजावणी १५ ऑगस्ट २०२३पासून करण्यात आली आहे. या निर्णयामुळे रुग्णालयांमधील बाह्य रुग्ण विभागातील रूग्णांची नोंदणी दुपटीने, तर काही ठिकाणी तिपटीने वाढली आहे.

हृदयरोग रुग्णांसाठी राज्यामध्ये सर्व सुविधांची उपलब्धता शासकीय रूग्णालयांमध्ये करण्यात येत आहे. हृदय रोगींसाठी राज्यात १२ ठिकाणी कॅथलॅबची सुविधा देण्यात आली आहे. ही सुविधा आता संपूर्ण जिल्ह्याच्या ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा शासनाचा मानस आहे. तसेच १७ ठिकाणी एमआरआयची सुविधादेखील उपलब्ध करून देण्यात आली आहे.

राज्यात जालना, भिवंडी, पुणे आणि नागपूर येथे मानसिक आरोग्य व नवीन व्यसनमुक्ती केंद्रे निर्मितीची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. ठाणे व कोल्हापूर जिल्ह्यातील उदेगाव येथे अत्याधुनिक प्रादेशिक मनोरुग्णालय उभारण्यात येणार आहे. हे रुग्णालय नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ ॲण्ड न्युरोसायन्सेसच्या धर्तीवर अत्याधुनिक मनोरुग्णालय असणार आहे. यामध्ये अत्याधुनिक शस्त्रक्रिया गृह, अतिदक्षता विभाग, संशोधन विभाग, प्रशिक्षण विभाग, क्रीडा विभाग, योगा व मनन चिंतन या सेवांचा समावेश असणार आहे.

वृद्धांना मोतीबिंदूची समस्या मोठ्या प्रमाणावर येते. राज्य शासनाने मोतिबिंदूमुक्त महाराष्ट्र अभियान राबविले. या अभियानातून मोतिबिंदूमुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार करण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून सध्या लाखांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

सध्या विविध कर्करोगांचे प्रमाण वाढले आहे. यामध्ये स्तन, गर्भपिशवीच्या मुखाचा, मुख कर्करोगाचे प्रमाण लक्षणीय आहे. कर्करोगावरील उपचार खूप खर्चिक आहे. शासनाने कर्करोग रुग्णांना उपचार सुलभ व्हावे, यासाठी ३४ जिल्ह्यांमध्ये जिल्हा रुग्णालयात केमोथेरपी डे केअर केंद्राची सुविधा दिली आहे. शासनाच्या सुविधांमुळे कर्करुग्णांवर उपचार मिळणे सोयीचे होणार आहे, तसेच कर्करोगाचे निदान लवकर होण्यासाठी आठ मोबाईल कॅन्सर डायग्नोस्टिकची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येत आहे. कर्करुग्णांच्या शोधासाठी आरोग्य विभागामार्फत नियमितपणे सर्वेक्षणाद्वारे संशयित कर्करोगी शोधले जात आहेत. संशयित रुग्णांसाठी बायोप्सी करणे आवश्यक करण्यात आले आहे.

मुत्रपिंडाच्या आजाराने त्रस्त असलेल्या रूग्णांसाठी २३४ तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात डायलिसीस सेवा, हिमोफिलीयाग्रस्त रूग्णांसाठी प्रत्येक जिल्हा रूग्णालयात हिमोफिलिया डे केअर केंद्राची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. गर्भधारणापूर्व माता व दोन वर्षापर्यंतच्या बालकांचे आरोग्य सुधारण्यासाठी वात्सल्य ही विशेष योजना राबविण्यात येत आहे. कमी वजनाच्या बालकांच्या जन्माचे प्रमाण आणि जन्मजात व्यंग असलेल्या बालकांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे, तसेच माता मृत्यू व बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने राज्यातील आदिवासी व दुर्गम भागात माहेरघर योजनेला मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्यात आधुनिक उपकरणासहित व तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकासह एक हजार ७५६ ॲम्ब्युलन्स खरेदीचा निर्णयही घेण्यात आला आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना जलद गतीने उपचार मिळण्यास निश्चितच मदत होणार आहे. राज्यातील प्रत्येक तालुक्यासाठी एक शववाहिका उपलब्ध करून देण्यात येत आहे. सध्या ३६ ठिकाणी उपलब्ध शववाहिका उपलब्ध करून देण्यात आली असून ३५२ ठिकाणी लवकरच ही सेवा देण्यात येणार आहे. अशाप्रकारे राज्य शासनाने जनसामान्यांच्या उपचाराची काळजी घेण्यासाठी विविध निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली आहे.

**-निलेश तायडे,**
**विभागीय संपर्क अधिकारी**




# यूट्यूब चॅनेलला ठेवा सुरक्षित, होणार नाही हॅक

जर तुमच्या यूट्यूब चॅनलचेसुद्धा लाखो सबस्क्राइबर्स असतील किंवा भविष्यात तुम्हाला युट्युबच्या माध्यमातून तुमचे करिअर चालू करायचे असेल तर तुम्हाला जास्त सावध राहण्याची गरज आहे. हॅकर्स अनेकदा नवीन आणि जुन्या चॅनलला लक्ष्य करतात. एकदा तुमचे यूट्यूब खाते हॅक झाल्यानंतर तुम्ही तुमच्या चॅनलमध्ये प्रवेश करू शकणार नाही.




हॅकर्स तुमचे यूट्यूब चॅनल कंट्रोल करू शकतात तसेच ते विकू किंवा जाहिरात कमाईसाठी वापरू शकतात. जर तुमचे युट्युब चॅनल कधी हॅक झालेच तर तुम्ही काय केले पाहिजे? याबद्दल आपण सविस्तर माहिती घेऊयात.

जर तुमचे यूट्यूब अकाउंट हॅक झाले तर तुमच्यासमोर दोन परिस्थिती निर्माण होतील. पहिल्या प्रकरणात तुम्ही तुमचे चॅनल लॉग इन करू शकाल आणि दुसऱ्या प्रकरणात तुम्ही लॉग इन करू शकणार नाही. दोन्ही परिस्थितींमध्ये काय करावे याबद्दल अधिक माहिती जाणून घेऊया.

जर तुमचे अकाउंट हॅक झाल्यानंतरही लॉग इन होतं असेल, तर तुम्हाला सर्वप्रथम तुमचा पासवर्ड बदलणे आणि सर्व डिव्हाइसेसवरून अकाउंट लॉगआउट करणे आवश्यक आहे. चला याबद्दल स्टेप बाय स्टेप माहिती घेऊयात.

**अकाऊंटचा पासवर्ड कसा बदलायचा?**

सर्वप्रथम तुम्हाला ब्राउझरमध्ये गुगल अकाउंट लॉग इन करावे लागेल. गुगल प्रोफाइल फोटोवर क्लिक करून, तुम्हाला मॅनेज युवर गुगल अकाउंटवर टॅप करावे लागेल. येथे तुम्हाला सिक्युरिटीवर टॅप करा आणि गुगलवर साइन इन करा. येथे पासवर्ड पर्याय निवडल्यानंतर, तुम्हाला तुमचा नवीन पासवर्ड टाकावा लागेल. स्ट्राँग पासवर्ड ठेवण्याचा प्रयत्न करा.

**सर्व डिवाइसमधून लॉगआउट कसे करावे?**

सर्वप्रथम तुमचे गुगल अकाउंट लॉग इन करा. गुगल प्रोफाइल चिन्हावर क्लिक करा आणि मॅनेज युवर गुगल अकाउंटवर जा. येथे तुम्ही सिक्युरिटी आणि युवर डिव्हायसेस या पर्यायावर टॅप कराल. युवर डिव्हाइसेस पर्यायाच्या अंतर्गत, तुम्हाला सर्व डिव्हाइसेसची सूची मिळेल ज्यामध्ये तुमचे अकाउंट लॉग इन आहे. येथून जी डिवाइस तुम्हाला नसेल ती रिमूव्ह करा.

जेव्हा तुम्ही तुमचे यूट्यूब चॅनल लॉग इन करू शकत नाही, तेव्हा तुमच्यासाठी यूट्यूब अकाउंट रिकवरी प्रोसेस हा एकमेव पर्याय उरतो.

# क्रांतिकारक शहीद भगत सिंग



**निमित्त**

देशाच्या स्वातंत्र्यासाठी हसत-हसत प्राणांचे बलिदान देणाऱ्या आणि अनेक पिढ्यांना प्रेरणादायी असे जीवन जगलेले क्रांतिकारक शहीद भगत सिंग यांची आज (२८ सप्टेंबर) जयंती. भगत सिंग म्हणजे भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामतील एक त्सुनामी होती. या वादळाने ब्रिटिश राजवटीला सळो की पळो करून सोडले होते, तर दुसरीकडे देशाच्या स्वातंत्र्यासाठी वेगवेगळ्या लढणाऱ्या संस्था, संघटना व व्यक्तींना एकत्र आणण्याचे काम केले. भगत सिंग यांच्या जहाल विचारांमुळे भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीला कमालीचा वेग आला. आजही प्रत्येक भारतीय त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेतो. भारतमातेच्या या थोर सुपुत्राची जयंती देशभरात अत्यंत उत्साहात साजरी केली जाते.

भगत सिंग यांचा जन्म सध्या पाकिस्तानचा भाग असलेल्या पंजाब प्रांतातील लायपूर जिल्ह्यातील बंगा इथे २८ सप्टेंबर १९०७ रोजी वडील किशन सिंह आणि आई विद्यावती यांच्या पोटी झाला. आजीने त्यांचे नाव भगानवाला (एक भाग्यवान) ठेवले. पुढे ते भगत सिंग म्हणून ओळखले जाऊ लागले.

भगत सिंग यांना देशसेवेचा वारसा घरातूनच मिळाला होता. त्यांचे वडील किशन सिंग, काका अजित सिंग आणि स्वरण सिंग हे स्वातंत्र्यसैनिक होते. भगत सिंग यांनी लाहोरच्या डीएव्ही हायस्कूलमध्ये शिक्षण घेतले. १९१९मध्ये गांधीजींच्या नेतृत्वाखाली असहकार चळवळ सुरू झाली, तेव्हा भगत सिंग सातवीत शिकत होते, मात्र त्यांना देशाचे स्वातंत्र्यलढा खुणावत होता. अखेर वयाच्या १५व्या वर्षी त्यांनी आपल्या परीनं यात खारीचा वाटा उचलायला सुरुवात केली. गुप्त क्रांतिकारी कार्यात भाग घ्यायला सुरुवात केली.

१३ एप्रिल १९१९ रोजी बैसाखी सणाच्या दिवशी रौलेट कायद्याच्या निषेधार्थ जालियनवाला बागेत एक जनसभा झाली. ब्रिटिश जनरल डायरच्या क्रूर आणि जाचक आदेशामुळे ब्रिटिश सैनिकांनी नि:शस्त्र लोकांवर अंदाधुंद गोळीबार केला. या अत्याचारामुळं देशभरात क्रांतीची ज्वाळा अधिकच भडकली. या हत्याकांडाचा १२ वर्षांच्या भगत सिंग यांच्या मनावर मोठा परिणाम झाला. जालियनवाला बागेतील रक्ताने लाल झालेल्या मातीवर त्यांनी इंग्रजांच्या विरोधात प्रखर लढा उभारण्याची शपथ घेतली. त्यानंतर महाविद्यालयीन शिक्षण थांबवून त्यांनी 'नौजवान भारत सभा' या संघटनेची स्थापना केली.

सुखदेव आणि राजगुरू यांच्यासोबत भगतसिंग यांनी काकोरी प्रकरण घडवून आणले. भगतसिंग यांनी राजगुरूंसोबत १७ डिसेंबर १९२८रोजी लाहोरमध्ये सहाय्यक पोलीस अधीक्षक असलेले ब्रिटिश अधिकारी जेपी सॉंडर्स यांची हत्या केली होती. चंद्रशेखर आझाद यांनी त्यांना यात पूर्ण मदत केली होती.

भगतसिंग यांनी बटुकेश्वर दत्त यांच्यासोबत ८ एप्रिल १९२९ रोजी दिल्लीतील अलिपूर रोड येथील तत्कालीन सेंट्रल असेंब्ली ऑफ ब्रिटिश इंडियाच्या सभागृहात बॉम्ब आणि पॅम्प्लेट फेकले. या घटनेने ब्रिटिश सरकार हादरून गेले आणि देशात भगतसिंग यांचा बोलबाला झाला.

'इन्कलाब झिंदाबाद' ही भगत सिंग यांची घोषणा खूप प्रसिद्ध झाली. त्याचा उल्लेख ते करीत असत. त्यांना ७ ऑक्टोबर १९३० रोजी फाशीची शिक्षा सुनावली गेली. ते धीरोदत्तपणे या शिक्षेला सामोरे गेले. **(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**पनवेल : दमदार पावसामुळे यंदा भातपिक चांगले आले असून किरवली गावामध्ये बहरलेल्या शेतीचे टिपलेले छायाचित्र.**

## आरोग्य प्रहर

# चिकन-मटनपेक्षा 'या' ड्राय फ्रूटमध्ये जास्त व्हिटॅमिन

व्हिटॅमिन बी १२ शरीरासाठी महत्त्वाचे असते. शाकाहारी लोकांमध्ये त्यांची कमतरता असते. व्हिटॅमिन बी १२ हे मांसाहारी पदार्थांमध्ये जास्त प्रमाणात आढळते, परंतु काही ड्रायफ्रुट्समध्येही याचे प्रमाण चांगले असते. व्हिटॅमिन बी १२च्या कमतरतेमुळे शरीर कमकुवत होऊ शकते. व्हिटॅमिन बी १२चे चांगले स्रोत कोणते ड्राय फ्रूट आहेत ते जाणून घ्या.



मनुका म्हणजे किसमिस. हेसुद्धा व्हिटॅमिन बी १२चे चांगले स्त्रोत आहेत. रात्री मनुका भिजवून सकाळी त्या खाल्यामुळे त्याचा चांगला फायदा होतो. किसमिस इतर ड्राट फ्रूटच्या तुलनेत स्वस्तसुद्धा असतात. मनुका खाल्यामुळे हाडे अधिक मजबूत होतात.

खजूरमध्ये नैसर्गिक गोडवा असतो. हा पदार्थ चविष्टसुद्धा आहे. यामध्ये व्हिटॅमिन बी १२देखील चांगले असते आणि विविध पदार्थांमध्ये समाविष्ट केले जाऊ शकते. उपवास असताना अनेक वेळा खजूरचे सेवन केले जाते. खजूर खाल्यामुळे मेंद अधिक तल्लख होतो.

काजू हे व्हिटॅमिन बी १२चे मौल्यवान स्त्रोत आहेत. हे बऱ्याचदा स्नॅक म्हणून खाल्ले जातात. तसेच विविध पदार्थांमध्ये त्याचा वापर केला जातो. काजूचा वापर केल्यामुळे तुमचा आहार एक स्वादिष्ट आणि पौष्टिकसुद्धा होतो.

पिस्ता केवळ स्वादिष्टच नाहीत तर त्यामध्ये व्हिटॅमिन बी १२चे प्रमाणदेखील चांगले आहे. ते स्नॅक म्हणून, सॅलड टॉपिंग म्हणून किंवा दही किंवा डेझर्टमध्ये मिसळून खाल्ले जाऊ शकतात. पिस्तामध्ये फाइबर मुबलक प्रमाणात असते.

बदामात व्हिटॅमिन बी १२च्या लक्षणीय आहे. बदाम खाण्याचे अनेक फायदे आरोग्याला होतात. नास्तामध्ये किंवा सॅलड्स, दही किंवा मिष्टान्नमध्ये बदाम टाकून खातात. भारतात बदामाचे उत्पादन पुरेसे नसल्याने त्याची अफगाणिस्तान व इराण येथून आयात होते.

भोपळ्याच्या बियांमध्ये मुबलक प्रमाणात व्हिटॅमिन बी १२ असते, तसेच इतर आवश्यक पोषक तत्वांचा त्यामध्ये समावेश असतो. आपल्या रोजच्या आहारात भोपळ्याच्या बियांचा समावेश करा किंवा स्नॅक म्हणून खा. याशिवाय सूर्यफुलाच्या बिया, अंजीर, अक्रोड यामध्येही बी १२ असते. अशा प्रकारे हे पदार्थ खाल्यास व्हिटॅमिन बी १२ची शरीरातील गरज आपण भरून काढू शकतो.

# अलिबागमध्ये सफाई कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य शिबिर

## १०० जणांची तपासणी; स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत उपक्रम



**रायगड : रामप्रहर वृत्त**

अलिबाग पंचायत समिती येथे स्वच्छता कर्मचारी यांचे आरोग्य शिबिर उत्साहात झाले. या शिबिरात अलिबाग तालुक्यातील ग्रामपंचायतींचे १०० स्वच्छता कर्मचारी उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यात सर्व ग्रामपंचायतीमध्ये स्वच्छता ही सेवा अभियान सुरू असून स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता या थीमनुसार विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्यामध्ये सफाई कर्मचारी यांची आरोग्य तपासणी व त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी अलिबाग येथे शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्याचा लाभ अनेक स्वच्छता कर्मचाऱ्यांना मिळाला. इतर तपासणी बरोबर डोळ्यांची तपासणी करून सेप्टिक गॉगल्स देण्यात आले.

या वेळी राजिप पाणी व स्वच्छता विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले मार्गदर्शन करताना म्हणाल्या की, सफाई कर्मचारी गावाचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी महत्त्वाची भूमिका पार पाडतात. त्यांच्या आरोग्याची काळजी घेतली जावी म्हणून शासनाने अशी शिबिरे आयोजित केले होते.

जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक जयवंत गायकवाड सांगितले की, आरोग्याची काळजी घेताना स्वच्छता कर्मचाऱ्यांनी मास्क वापरावा, हातात ग्लोज असावेत, पायात गमबुट व डोळ्यांच्या संरक्षणासाठी गॉगलचा वापर करून स्वतःची सुरक्षितता जपावी असे आवाहन केले. माणुसकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.राजाराम हुलवान यांनी, स्वच्छता कर्मचाऱ्यांनी नियमित वैद्यकीय तपासणी करून घ्यावी, शारीरिक इजा होऊ नये म्हणून दक्षता घ्यावी, आजाराकडे दुर्लक्ष करू नये, स्वतःबरोबर कुटुंबाची आरोग्य चांगले ठेवण्यासाठी प्रयत्न करावा, असे आवाहन केले.

रायगड मेडिकल असोसिएशन अध्यक्ष डॉ. निशिकांत आठवले यांनी, स्वच्छता कर्मचारी यांनी तंबाखू, दारू, गुटखा, सिगारेट या व्यसनापासून दूर राहावे. व्यसनमुक्त राहून चांगला आहार घ्यावा, स्वच्छ अन्न घ्यावे, असे आश्वासन त्यांनी दिले.

रायगड मेडिकल असोसिएशनचे सचिव डॉ. राजेंद्र चांदोरकर, सिव्हिल हॉस्पिटल अलिबाग कुष्ठरोग विभाग प्रमुख डॉ.संकपाळ, सिव्हिल हॉस्पिटलचे मेडिकल ऑफिसर डॉ.किमया, डॉ. ऋषिकेश तसेच लायन्स क्लब अलिबाग डायमंड अध्यक्ष डॉ. रेखा म्हात्रे, अ‍ॅड.गौरी म्हात्रे, सहाय्यक प्रशासन अधिकारी राजेंद्र भंडे, संवाद तज्ज्ञ सुरेश पाटील, अनिषा पाटील, रश्मी घरत आदी उपस्थित होते.

# सण साजरे करताना महिलांची सुरक्षा महत्त्वाची -विक्रम कदम

**चौक** : नवरात्रोत्सवात गरबा, दांडिया नाचाच्या वेळी महिला व मुलींची छेडछाड असे प्रकार घडू नये. महिलांची सुरक्षितता अतिशय महत्त्वाची असून सर्व बाबी कायद्याच्या चौकटीत राहून करा, असे आवाहन खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी केले.

घटस्थापनेच्या अनुषंगाने सार्वजनिक नवरात्री मंडळांच्या अध्यक्ष, पदाधिकारी आणि गाव पोलीस पाटीलांची बैठक खालापूर पोलीस ठाण्यात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस वरीष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनीही मार्गदर्शन केले. सर्व मंडळांनी ऑनलाईन व संबंधित विभागांची परवानगी घ्यावी, मंडप परिसरात सीसीटिव्ही कॅमेरे, कायदेशीर विद्युत पुरवठा घ्यावा, जातीधर्मात तेढ निर्माण होईल असे बॅनर, देखावे किंवा चित्रफित निर्माण करू नये, गरबा खेळताना बिभत्स व आक्षेपार्ह गाणी लावू नये, महिलांची सुरक्षितता राखावी, डिजे अथवा डॉल्बी वापरू नये, दिलेल्या वेळेचे पालन करावे, अशा सूचना देण्यात आल्या.




## दर पत्रक

सत्यमेव को. ऑप. हौसिंग सोसायटी लि. इमारतीमधील सचिव इमारतीमधील ए व बी बींग बाजूकडे लिफ्ट बसविण्यासाठी सीलबंद दरपत्रके मागवित आहे. सदरील दर पत्रके ही दिनांक ३१/१०/२०२४ पर्यत किंवा तत्पूर्वी पोच होतील या नुसार सादर करावीत.

१. दर पत्रके पोस्टाने पाठविली व वेळेवर प्राप्त झाली नाही तर त्याची जबाबदारी सोसायटीची असणार नाही, किंवा त्यासाठी संबंधितास सोसायटीकडे तक्रार करण्याचा अधिकार राहणार नाही. तसेच उशिरा प्राप्त झाल्याने संबंधितास खुलासा देणेस सोसायटीची बांधिलकी राहणार नाही.

२. इमारतीचा पत्ता पुरील प्रमाणे आहे. सत्यमेव को. ऑप. हौसिंग सोसायटी लि. प्लॉट क्रमांक ८, सेक्टर- ४, सेंट जोसेफ हायस्कुल जवळ, कळंबोली ४१० २१८.

३. इमारतीमधील ए व बी बाजूस लिफ्ट बसवावयाची आहे. त्यासाठी आपणांस केव्हाही पहाणी करता येईल.

४. सोसायटीस ३१/१२/२००३ रोजी सिडको कडून रहिवासी दाखला मिळालेला आहे. (O. C.) सोसायटीची नोदणी दिनांक २५/०९/२००६ नुसार झालेली आहे.

५. सोसायटीमध्ये लिफ्ट बसवितांनाचे दर सर्व आकार मिळून असावेत, जसे जीएसटी, वहातूक, सामान मजूर, इत्यादि.

६. लिफ्ट कोणत्या कंपनीची बसविणार आहात, त्या कंपनीचे नाव असणे गरजेचे आहे. लिफ्टमध्ये चार माणसे राहतील एवढ्या आकाराची असावी.

७. बसविण्यात येणारी लिफ्टची गॅरटी देणे तसेच त्या अनुषंगाने अटी शर्ती देणे आवश्यक आहे.

८. कामाची ऑर्डर दिल्यानंतर मटेरियल इमारतीमध्ये आल्यानंतरच आगाऊ रक्कम अदा केली जाईल.

९. लिफ्ट बसवितांना सिडको /महानगर पालिकेचा परवानगी घेणे आवश्यक असल्यास ती परवानगी घेणेची जबाबदारी ठेकेदाराची राहिले.

१०. प्राप्त झालेल्या एक किंवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा हक्क खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

जा.क्र. सकोहौसो / ३८६
सत्यमेव को. ऑप. हॉ.सो.लि.
प्लॉट नंबर ८, सेक्टर-४,
कळंबोली ४१० २१८
दिनांक :- २७/०९/२०२४

सही/-
अध्यक्ष / सचिव
सत्यमेव को-ऑप. हौ. सो. (लि.)
प्लॉट नं.८, से. ४ कलंबोली.



## पनवेल महानगरपालिका, पनवेल

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

### जाहिर सुचना
### मलनिःस्सारण विभाग

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने मलनिः स्सारण विभागातील खालील कामांचे अंदाजपत्रक बनविण्याकरीता संबंधीत उत्पादकांकडुन (Manufacturer) वेगवेगळ्या बार्बीचे दर मागविण्यात येत आहे.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील विविध प्रभागामधील राष्ट्रीय महामार्गालगत प्री- फेब्रीकेटेड शौचालय उभारणेबाबत.

सदरची माहिती www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जा.क्र.पमपा/जनसंपर्क,/३१२४/प्र.क्र.४९२/४९४/२०२४
दिनांक २७/१०/२०२४

सही/-
शहर अभियंता
पनवेल महानगरपालिका



## माथेरान गिरीस्थान नगरपरिषद

माथेरान, ता. कर्जत, जिल्हा रायगड. ४१०१०२, ई-मेल आयडी: mcomatheran@gmail.com

जावक क्र. : मागिनप/००११/२०२४-२५ | दिनांक : २५/०९/२०२४

### माथेरान गिरीस्थान नगरपरिषद, जि. रायगड
### निविदा सूचना सन २०२४-२५

माथेरान गिरीस्थान नगरपरिषद खालील कामाकरिता शासकीय किवा नोंदणीकृत अ-शासकीयपुरवठादार यांचेकडून सीलबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाचा कालावधी |
|---|---|---|
| १ | माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांकरिता सर्व वेळ हंगाम उपयोगासाठी (पावसाळा +हिवाळा) जॅकेट पुरवठा करणे. | कार्यादेश मिळाल्यापासून १ महिना |
| २ | माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेच्या बि. जे. हॉस्पिटल, कार्यालयासाठी रॅक, कपाटे, उपकरणे इ. साहित्य पुरवठा करणेबाबत | कार्यादेश मिळाल्यापासून १ महिना |
| ३ | माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेच्या कर्मचारी यांचे निवासस्थानाची किरकोळ दुरुस्ती करणे बाबत. | कार्यादेश मिळाल्यापासून १ महिना |

**अटी - शर्ती**

१. निविदा पत्रक विक्रीची किंमत रक्कम रुपये ५००/- ना परतावा नगरपरिषद कार्यालयात रोखीने भरून सुट्टीचे दिवस वगळता दिनांक. २८/०९/२०२४ ते ०७/१०/२०२४ रोजी कार्यालयीन वेळेत संबंधीत विभागात संस्थेच्या लेटरहेडवर मागणी अर्ज केल्यानंतर उपलब्ध होतील. निविदा फॉर्म फी भरल्याची पावती दाखविल्याशिवाय निविदा फॉर्म दिले जाणार नाहीत.

२. निविदे संबधीची अनामत रक्कम रुपये ५०००/- डी.डी. द्वारे स्वीकारण्यात येईल. निविदेसोबत अनामत रक्कम भरल्याचा डी.डी. जोडणे अवश्यक आहे.

३. सीलबंद निविदा स्वीकारण्याचा दिनांक. ०७/१०/२०२४ रोजी ५.०० वाजेपर्यत असून शक्य झाल्यास सिलबंध निविदा सायंकाळी ५.३० वाजता नगरपरिषदेच्या सोयीनुसार मुख्याधिकारी यांच्या दालनात हजर असलेले निविदा धारक किवा प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

४. प्रत्येक कामाचा निविदेचा लिफाफा क्र. १. व लिफाफा क्र. २ असे राहतील. तांत्रिक बोलीचा लिफाफा क्र. १ मध्ये अ) अनामत रक्कम भरल्याचा डी.डी. ब) नोंदणी प्रमाणपत्र व निविदे फॉर्म सोबत असलेले सर्व परिशिष्ट भरून जोडणे आवश्यक आहे. क) संविदेमध्ये पदाधिकाऱ्याचा सहभाग नसल्या बाबतचे प्रतिज्ञा पत्र. ड) पुरवठा धारक अधिकृत असल्याचे प्रमाणपत्र तसेच लिफाफा क्र. २ मध्ये पुर्ण भरलेली वित्तीय निविदा असेल.

५. लिफाफा क्र. १ उघडून छाननीअंती त्यातील तांत्रिक कागदपत्रे योग्य असल्यास वित्तीय बोलीचा लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल. कागद पत्र सीलबंद करण्याचे आहेत.

६. निविदापत्रके पोस्टाने पाठविल्यास स्वीकारली जाणार नाहीत. मंजूर पुरवठा धारकास आवश्यक त्या स्टॅम पेपर वर नगरपरिषदेच्या अटी-शर्ती नुसार करारनामा करून द्यावा लागेल.

७. प्राप्त निविदा पैकी कोणतीही १ निविदा स्वीकारण्याची अथवा नाकारण्याचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवलेला आहे. त्याची कारणे दिले जाणार नाहीत.

सही/-
मुख्याधिकारी
माथेरान गिरीस्थान नगरपरिषद



## पनवेल महानगरपालिका, पनवेल

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

| अ. क | कामाचे नाव | निविदा क्र. | दिलेल्या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. | इसारा रक्कम रुपये | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग (अ) मधील विविध उद्यानांमध्ये लॉन लावणे व ३ वर्षाकरीता देखभाल करणे. | PMC/ Garden/ ०३/ २०२४-२५ | रु.४,००,३६,२४१/- (GST विरहित) | ४,००,३६२/- | ३६ महिने |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २७/०९/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र.४९४/४९६/२०२४
दिनांक २७/०९/२०२४

सही/-
(डॉ.प्रशांत रसाळ)
अतिरिक्त आयुक्त- I
पनवेल महानगरपालिका



## महाराष्ट्र शासन

महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)
Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167

### निविदा सूचना क्रमांक ५१ सन २०२४-२०२५

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो.ता. महाड, जिल्हा. रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. को-या निविदा नमुना दिनांक **२७/०९/२०२४ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक ०४/१०/२०२४ रोजी १८.०० वाजे पर्यंत** www.mahapwd.gov.in या संकेत स्थळावरुन ऑनलाईन खरेदी करण्यांत येतील. व **दिनांक ०५/१०/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता ऑफलाईन पध्दतीने या कार्यालयात सादर कराव्यात** व कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, महाड हे भरुन पाठविलेल्या निविदा शक्यतो **दिनांक ०५/१०/२०२४ रोजी ११.०० वाजता** उघडतील. निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांची उपस्थित रहाने आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्यांचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा / बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | दहिवड वाकी शेवते रस्ता रा.मा. १०५ कि. मी. ०/०० ते ८/०० मध्ये सुरक्षात्मक उपाय योजना करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड, (आकस्मित निधी) | १००१९२३ | १०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| २ | लाडवली किंजलोळी मांघरून अड्राई शेवते रस्ता प्रा.जि.मा. ९५ कि.मी. ०/०० ते १०/०० मध्ये सुरक्षात्माक उपाय योजना करणे, तालुका गहाड, जिल्हा रायगड (आकस्मित निधी) | ९९२०९९ | १०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ३ | वीर नाते ते महाड रायगड रस्ता प्रा.जि.मा. ९७ कि.मी. ०/०० ते ३/५०० मध्ये सुरक्षात्माक उपाय योजना करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (आकस्मित निधी) | ९५१५७० | १०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ४ | मौजे वाकी बु. शिवाजी नगर येथे सभामंडप बांधणे, तालुका महाड, जिल्हा रायगड. (२५१५) | ८९४१०८ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ५ | मोहोत आखातेवाडी रस्ता तयार करणे, तालुका महाड, जिल्हा रायगड. (२५१५) | ८४५२६८ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ६ | मौजे आबंवडे पिपिळवाडी येथे रस्ता तयार करणे, तालुका महाड, जिल्हा रायगड (२५१५) | ८१५९२४ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ७ | मौजे कुर्ले गायकरवाडी रस्ता तयार करणे तालुका महाड, जिल्हा रायगड (२५१५) | ८१३१९३ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ८ | मौजे रावढळ कोसबी हायस्कूल येथे संरक्षण भिंत बांधणे, तालुका महाड, जिल्हा रायगड. (२५१५) | ८१६३०९ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ९ | तुडील भेलोशी मंडणगड रस्ता प्राजिमा ६६ कि.मी. ०/०० ते ६/०० मध्ये सुरक्षात्माक उपाय योजना करणये, तालुका महाड़, जिल्हा रायगड. (२५१५) | ६९१६१५ | ७००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| १० | मोजे कोल येथे संरक्षण भिंत बांधणे, तालुका महाड, जिल्हा रायगड. (२५१५) | ६५३८०४ | ७००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ११ | भोजे रेवतळे मुमूर्शी येथे रस्ता तयार करणे तालुका महाड़, जिल्हा रायगड. (२५१५) | ५६९५५६ | ६००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| १२ | मौजे करंजाडी ठाकरकोंड येथे सभामंडप बांधणे, तालुका महाड, जिल्हा रायगड. (२५१५) | ४८९२३६ | ५००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग आठ व वरील |

टिप :- १) तपशिलवार निविदा सुचना https//mahapwd.gov.in या संकेतस्थळांबर पाहता किवा विकत घेता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/ ४५६५
दिनांक : २६/०९/२०२४

सही/
कार्यकारी अभियंता
महाड (सा.बां.) विभाग, महाड

विमाका/कोवि/२०२४-२०२५/१०८



## उरण नगरपरिषद
### निविदा सूचना

जा.क्र. उनप/बांवि/३०६९/२०२४-२०२५
उरण नगरपरिषद,
उरण, दिनांक :- २७-०९-२०२४

उरण नगरपरिषद खाली नमूद केलेल्या कामाकरिता नोंदणीकृत अथवा अनुभवी कंत्राटदारांकडून मोहरबंद निविदा मागवित आहे. निविदा दिनांक ८-१०-२४ रोजी ४.०० वाजेपर्यंतच्या मुदतीत मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांच्या नांवे दाखल करणेच्या आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (रुपये) | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत | | कामाची मुदत | निविदा फॉर्म फी रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २% रोखीने | ७% बिलातून | | |
| १ | उरण नगरपरिषद हद्दीतील उरण मासळी मार्केटला रंगरंगोटी करणे. | रु. १,७१,३३३/- | रु. १,७१३/- | रु. ३,४२७/- | रु. ११,९९३/- | २५ दिवस | रु. ५००/- |
| २ | उरण नगरपरिषद हद्दीतील भवरा-उरण येथे सौ. सुमित्रा कृष्णा कोळी ते श्री. राकेश कोळी यांच्या घरापर्यंत गटाराकरिता आर.सी.सी. पाईप टाकणे. | रु. १,४१,६१९/- | रु. १,४१६/- | रु. २,८३२/- | रु. ९,९१३/- | २५ दिवस | रु. ५००/- |
| ३ | उरण नगरपरिषद हद्दीतील भवरा-उरण येथे श्री. चंद्रकांत काशिनाथ कोळी ते श्री. सुधाकर देवेश कोळी यांच्या घरापर्यंत गटाराकरिता आर.सी.सी. पाईप टाकणे | रु.१,४०,४०३/- | रु. १,४०४/- | रु. २,८०८/- | रु. ९,८२८/- | २५ दिवस | रु. ५००/- |
| ४ | उरण नगरपरिषद हद्दीतील भवरा-उरण येथील श्री. नितीन कोळी ते श्री. हेमंत कोळी यांचे घरापर्यंत गटाराकरिता ४५० एम.एम. व्यासाचे सिमेंट पाईप टाकणे. | रु. ९५,४४७/- | रु. ९५४/- | रु. १,९०९/- | रु. ६,६८१/ | १५ दिवस | रु. ५००/- |
| ५ | उरण नगरपरिषद हद्दीतील भवरा उरण येथील रेल्वे बांधाजवळील श्री. संभाजी नामदेव कोळी ते श्री. सतिश वाल्मिकी यांचे घरापर्यंत गटाराकरिता आर.सी.सी. सिमेंट पाईप टाकणे. | रु.१,८६,१९३/- | रु. १,८६१/- | रु. ३,७२४/- | रु. १३,०३४/- | २५ दिवस | रु. ५००/- |
| ६ | उरण नगरपरिषद हद्दीतील भवरा-उरण येथील श्री. नितीन कोळी ते श्री. विष्णू कोळी यांचे घरापर्यंत गटाराकरिता आर.सी.सी. पाईप टाकून त्यावर पी.सी.सी. करणे. | रु. ७४,२७८/- | रु. ७४३/- | रु. १,४८५/- | रु. ५,१९९/- | १५ दिवस | रु. ५००/- |
| ७ | उरण नगरपरिषद हद्दीतील भवरा उरण येथील श्री. लमण उत्तम वाघ ते श्री. देवेंद्र वाल्मीकी यांचे घरापर्यंत गटाराकरिता आर.सी.सी. पाईप टाकून त्यावर पी.सी.सी.करणे. | रु. १,३६,०२३/- | रु. १,३६०/- | रु. २,७२०/- | रु. ९,५२२/- | २५ दिवस | रु. ५००/- |
| ८ | उरण नगरपरिषद हद्दीतील भवरा उरण येथील श्री. परशुराम मोतीराम कोळी ते राकेश कोळी घरापर्यंन गटाराकरिता आर.सी.सी. पाईप टाकणे. | रु. १,९२,१३८/- | रु. १,९२१/- | रु. ३,८४३/- | रु. १३,४५०/- | २५ दिवस | रु. ५००/- |
| ९ | उरण नगरपरिषद हद्दीतील बोरी उरण येथील श्री. विरेंद्र घरत यांचे घरापासून ते श्री. अनंत घरत यांचे घरापर्यंत पी.सी.सी. करणे. | रु.१,७२,९०९/- | रु. १,७२९/- | रु. ३,४५८/- | रु. १२,१०४/- | २५ दिवस | रु. ५००/- |
| १० | उरण नगरपरिषद हद्दीतील म्हातवली-उरण येथील नझीरशेठ वाडी येथील श्री. प्रविण पाटील ते श्री. हर्षद तांडेल यांचे घरापर्यंत गटाराकरिता ३०० एम.एम. व्यासाचे सिमेंट पाईप टाकणे. | रु. ३८,६५४/- | रु. ३८६/- | रु.७७३/- | रु. २,७०६/- | १५ दिवस | रु. ५००/- |
| ११ | उरण नगरपरिषदेचे बाजारपेठ उरण येथील नविन फुल मार्केट समोर आर.सी.सी. गटाराचे बांधकाम करणे | रु. १,३२,५८२/- | रु. १,३२५/- | रु. २,६५२/- | रु. ९,२८१/- | २५ दिवस | रु. ५००/- |
| १२ | उरण नगरपरिषदच हद्दीतील म्हातवली उरण येथे नझीरशेटवाडी येथील नझीरशेठ अपार्टमेट ते श्री. हर्षद तांडेल यांचे घरापर्यंत रस्त्याला पी.सी.सी. करणे. | रु. १,४२,२५२/- | रु. १,४२२/- | रु. २,८४५/- | रु. ९,९५७/- | २५ दिवस | रु. ५००/- |

सदर कामाच्या अटी/ शर्ती बांधकाम विभागातून माहितीकरिता उपलब्ध असून इच्छूक ठेकेदारांनी बांधकाम विभाग प्रमुख यांचेशी संपर्क साधावा.

सही/-
समीर जाधव
मुख्याधिकारी
उरण नगर परिषद

## निवडक

### दक्षिण रायगडात विद्यार्थ्यांना वह्यावाटप



**माणगाव** : गौरीशंकर मिठाईवाले परेल-मुंबई यांच्याकडून दक्षिण रायगडातील २४ शाळांमध्ये ३५०० विद्यार्थ्यांना वह्या व खाऊचे वाटप करण्यात आले. सहाय्यक पोलीस निरीक्षक पुष्कराज सूर्यवंशी, अभिनव ज्ञान मंदिर विद्यालयाचे मुख्याध्यापक नागनाथ सुर्वे तसेच २४ विद्यालयातील मुख्याध्यापक व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी या वेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिनव ज्ञानमंदिर विद्यालयातील विद्यार्थिनींनी केले. प्रास्ताविक सहाय्यक शिक्षक विनोद लाड यांनी केले, तर आभार मुख्याध्यापक नागनाथ सुर्वे यांनी मानले.

### नलिनी घुलघुले यांना ग्रामसमृद्धी पुरस्कार



**माणगाव** : नालंदा ऑर्गनायझेशन महाराष्ट्र राज्य आयोजित राज्यस्तरीय नालंदा, ग्रामसमृद्धी पुरस्कार नलिनी सीताराम मालोरे-घुलघुले यांना प्राप्त झाला आहे. हा पुरस्कार सोहळा रविवारी (दि.२२) पुणे येथे पार पडला. नलिनी मालोरे-घुलघुले सध्या मुळशी तालुक्यात कृषी सहाय्यक या पदावर कार्यरत आहेत. आतापर्यंतच्या सेवाकाळात त्यांना पंचायत समिती, जिल्हा परिषद कृषी विभागाकडून अनेक मानसन्मान उत्कृष्ट कामगिरीबद्दल मिळाले आहेत. त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### एकविरा माता दर्शन सोहळा उत्साहात



**नागोठणे** : नाभिक समाजाचे मुख्य मार्गदर्शक समाजाच्या हितासाठी सर्व समाजबांधवांना एकत्र आणुन एकजुटीचे महत्त्व पटवून देणारे भाई टके यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे शहर व विभागातील नाभिक समाजबांधवांची श्री बल्लाळेश्वर पाली, वरदविनायक महड व कार्ले येथील एकविरा माता दर्शन सोहळा बुधवारी (दि.२५) भक्तिमय वातावरणात पार पडला. दर्शन सोहळ्यास समाजाचे मार्गदर्शक भाई टके, बाळासाहेब टके, जिल्हा सचिव महेंद्र माने, सल्लागार शामकांत नेरपगार, माजी तालुकरध्यक्ष रवींद्र टके, ज्येष्ठ समाजबांधव दिगंबर खराडे, शहराध्यक्ष सुधाकर निंबाळकर, मिलिंद गुजर,विवेक रावकर, शेखर रावकर, मनोज गायकवाड, जितेंद्र जाधव, संदीप जाधव, सुशील टके, महेंद्र पवार, अशोक जाधव, राहुल मोहिते, सत्यजित रावकर, अमित मोरे, शेखर टके, ज्ञानेश्वर दळवी आदींनी सहभाग घेतला होता.

### विवेक ढेपे स्वच्छ भारत ब्रँड अँबेसिडर

**माणगाव** : नगरपंचायतीमार्फत विवा कॉलेजचे प्राचार्य विवेक



ढेपे यांची केंद्रशासन पुरस्कृत स्वच्छ भारत अंतर्गत ब्रँड अँबेसिडर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तशा आशयाचे नियुक्तीपत्र नागरपंचायतीतर्फे मुख्याधिकारी संतोष माळी यांनी दिले आहे. विवेक ढेपे यांच्या या नियुक्तीबद्दल त्यांचे शिवसेनेचे राज्य प्रवक्ते ॲड.राजीव साबळे, माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, आनंद यादव, सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा जाधव, शिक्षिका विनया जाधव, अविष्कार फाउंडेशनचे रायगड जिल्हाध्यक्ष शंकर शिंदे, सामाजिक कार्यकर्त्या शर्मिला सत्वे, संगणक तज्ज्ञ भालचंद्र खाडे आदींसह शिवजयंती व रक्तदान शिबिर सेवाभावी संस्था, कॉलेजचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# माथेरान स्मशानभूमीतील विद्युतदाहिनी बंद

## मृतदेह जाळण्यासाठी लाकडाचा वापर

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान येथील स्मशानभूमीत विद्युतदाहिनी बसविण्यात आली, मात्र देखभालीकडे दुर्लक्ष केल्याने ही विद्युतदाहिनी बंद पडलेली आहे. त्यामुळे मृतदेह जाळण्यासाठी याठिकाणी लाकडाचा वापर करावा लागत आहे.

येथील हिंदू स्मशानभूमी गावाच्या टोकाला तीन ते चार किमी अंतरावर असल्याने पावसाळ्यात त्रासदायक बनते. या ठिकाणी मागील वर्षी माथेरान भाजपच्या प्रयत्नातून मिशन माथेरान ग्रुपच्या माध्यमातून बदलापूर संस्थेच्या वतीने शववाहिनी देणगी मिळाली आहे. त्यामुळे वाहतुकीचा त्रास वाचला आहे, तसेच ही स्मशानभूमी जंगल भागात कड्यालगत असल्याने या स्मशानभूमीचा काहीसा भाग पावसाळ्यात कोसळला आहे.

> स्मशानभूमीच्या नूतनीकरणाबाबत निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. लवकरच कामाला सुरुवात करण्यात येणार आहे. सर्व अपेक्षित कामांची पूर्तता निश्चितच होईल.
>
> **-राहुल इंगळे, प्रशासक तथा मुख्याधिकारी, माथेरान नगरपालिका**

अंत्यसंस्कार करण्यात येणारी शेडही जीर्ण झाले असून पावसाळ्यात येथे निवाऱ्याची सोय नाही. स्मशानभूमी गावापासून खूप लांब असल्याने ग्रामस्थांनी संबंधित खात्याला स्मशानभूमी गावाच्या मध्यवर्ती भागात घ्यावी, याबाबत अनेकदा लेखी निवेदने दिलेली आहेत, मात्र याकडे दुर्लक्ष होत असल्याने नाराजी पसरली आहे.



## कर्जतमधील समस्यांबाबत नगर परिषदेला निवेदन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषद हद्दीमध्ये राहणाऱ्या नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांबाबत शहर बचाव समितीच्या माध्यमातून निवेदन बुधवारी (दि.२५) मुख्याधिकारी वैभव गारवे यांना देण्यात आले.

या निवेदनात नमूद करण्यात आलेल्या प्रमुख २६ मागण्यांचा अभ्यास आणि त्यावर कोणत्या उपाययोजना केल्या, याची माहिती शनिवारी (दि.२८) पालिका बचाव समिती समोर ठेवणार आहे. शनिवारी कर्जत शहरातील नागरिकांच्या समस्यांवर नागरिकांचे समाधान झाले नाही तर शनिवारीच पालिकेविरोधातील आंदोलनाची दिशा संघर्ष समिती जाहीर करणार आहे.

ॲड. कैलास मोरे यांच्या समितीच्या आवाहनानंतर



शेकडो कर्जतकर पालिका कार्यालयात जमले होते.

या वेळी माजी नगराध्यक्ष राजेश लाड, माजी नगरसेवक संतोष पाटील, सुनील गोगटे, सोमनाथ ठोंबरे, मोहन ओसवाल, राजाभाऊ कोठारी, प्रभाकर करंजकर, रंजन दातार, भानुदास पालकर, दिलीप गडकरी, सुरेश खानविलकर, मल्हारी माने, रणजित जैन, सोमनाथ पालकर, राजेश ओसवाल, विजय हरिश्चंद्रे, ॲड. गोपाळ शेळके, विजय बेडेकर, हरिश्चंद्र यादव, कृष्णा जाधव, युसुफ खान, ॲड. भावना पवार, अनिल भोसले, जयवंत म्हसे, अशोक दिघे, ॲड. भारती ढाकवळ, स्विटी बार्शी, सतीश मुसळे, अनिल मोरे, अशोक शिंदे, नितीन दगडे, सुहास प्रधान, प्रशांत उगले, समीर चव्हाण, दत्तात्रेय म्हसे आदींसह कर्जतकर नागरिक उपस्थित होते.

## मुख्याधिकारी पंकज भुसे यांना पदोन्नती

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड नगर परिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक पंकज भुसे यांची नुकतीच नवी मुंबई संचालनालयात सहाय्यक संचालकपदी पदोन्नती झाली आहे.

२०२१ ते २०२४ या तीन वर्षांचा कालावधीत पंकज भुसे यांनी नगर परिषदेचा पदभार सांभाळला. विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे त्यांची बदली झाली आहे. मुरुड नगरपरिषेच्या स्थापनेपासून या क वर्ग नगरपरिषदेला २०२२ ते २०२४ या दोन वर्षाच्या काळात कोट्यावधी रुपयांचा विकास निधी स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांच्या माध्यमातून उपलब्ध झाल्याने मुरुड शहराचा अंतरबाह्य कायापालट झाला ही वस्तुस्थिती कोणीही नाकारू शकत नाही, असे मत त्यांनी व्यक्त केले.

## बँकेच्या व्यवस्थापकाला मारहाण; आरोपीला कारावास

**अलिबाग : प्रतिनिधी**

बँक ऑफ इंडियाच्या शाखा व्यवस्थापकाला मारहाणप्रकरणी आरोपी सुरज परशुराम कोळी (रा.बोडणी, रेवस) याला अलिबागच्या जिल्हा व सत्र न्यायालयाने तीन महिन्यांची सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली, तसेच पाच हजारांचा दंडही ठोठावला.

ही घटना २२ मे २०२० रोजी घडली होती. अभिषेक गणेश वर्मा हे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या रेवस शाखेत शाखा व्यवस्थापक म्हणून काम पाहत होते. या वेळी आरोपी सुरज कोळी हे बँकेत आले. त्यांनी कर्जाचा थकीत हप्ता बचत खात्यातून कट झाल्याचा राग मनात शाखा व्यवस्थापक यांना मारहाण केली. याबाबत मांडवा सागरी पोलीस ठाण्यात आरोपी सुरज कोळी यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी तपास करून आरोपीविरोधात अलिबाग येथील जिल्हा व सत्र न्यायालयात याबाबतचे दोषारोपपत्र दाखल केले. प्रकरणाची सुनावणी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. एस राजंदेकर यांच्या न्यायालयासमोर झाली. शासकीय अभियोक्ता म्हणून स्मिता राजाराम धुमाळ पाटील यांनी काम पाहीले. सुनावणी दरम्यान एकूण १० जणांच्या साक्षी नोंदविण्यात आल्या. ज्यात फिर्यादी अभिषेक वर्मा, प्रत्यक्षदर्शी अगेंद्र कुमार ठाकूर, टेक्निशियन गिरीश घरत, तपासिक अंमलदार अतुल मडके यांच्या साक्षी महत्त्वपूर्ण ठरल्या.

दोन्ही बाजूचे युक्तीवाद ऐकल्यानंतर जिल्हा न्यायाधीश राजंदेकर यांनी शासकीय अभियोक्ता धुमाळ-पाटील यांचा युक्तीवाद ग्राह्य धरला आणि साक्षीपुरावे लक्षात घेऊन आरोपी सुरज कोळी यास शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी तसेच लोकसेवकांना मारहाण केल्याप्रकरणी दोषी धरले.

## पेणमध्ये हुतात्मा नाग्या कातकरी स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

**पेण : प्रतिनिधी**

अंकुर ट्रस्ट व लोकमंच या संघटनेतर्फे पेणमध्ये हुतात्म्या नाग्या महादू कातकरी यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. या वेळी टाटा स्टीलचे प्रकल्प समन्वयक भावेश रावल उपस्थित होते.

महाराष्ट्र मानवी हक्क आयोग सचिव नितीन पाटील (भा.प्र.से) यांनी, या देशात सर्व नागरिकांना एकच संविधान असून यामधील अधिकारही सर्वांना समान आहे, असे प्रतिपादन केले. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील यांनी, जंगलाचा राजा हक्क न मिळाल्यामुळे कामगार स्थलांतरित होत आहते, याबद्दल चिंता व्यक्त केली.

सन १९७७मध्ये हुतात्म्या नाग्या महादू कातकरी यांचे नाव चिरनेरच्या मूळ स्तंभावर यावे म्हणून अंकुर ट्रस्टमार्फत सर्वप्रथम चळवळ उभारण्यात आली होती. पेण शहरात गुरुवारी शेकडो आदिवासींनी आपल्या पारंपारिक वेशात आदिवासींचे नृत्य करीत वेगवेगळे मुखवटे घालत मिरवणुकीत रंगत आणली. या मिरवणुकीत आदिवासी विभागाचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी अतुल म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर उपस्थित होते. रॅलीचे गांधी मंदिर येथे सभेत रूपांतर झाले. आदिवासी कार्यकर्ते संजय नाईक, ग्रामपंचायत सदस्य अंजली वाघमारे, कातकरी विद्यार्थिनी निकिता वाघ, वंदना वाघमारे यांनी प्रश्नांची मांडणी केली. मानवी हक्क आयोगामार्फत त्याची दखल घेतली गेली. आदिवासींनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.



## गणेश सजावट स्पर्धेचा निकाल जाहीर



**अलिबाग : प्रतिनिधी**

श्री समर्थ विचार फाउंडेशन रायगडच्या वतीने आयोजित स्व. आद्य नाईक स्मृती गणेश सजावट स्पर्धेत मोठे शहापूर येथील अनिल पाटील यांनी प्रथम क्रमांक मिळविला. या स्पर्धेमध्ये ५४ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

मोठी शहापूर येथील अनिल पाटील यांनी प्रथम क्रमांक मिळवला. त्यांनी केदारनाथ, वाढती वृक्षतोड व ईर्शाळवाडी हा देखावा सादर केला होता. त्यांना ५५५५ रुपये, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र; द्वितीय क्रमांक विपुल पाटील कनकगिरी अश्मयुगातील गणेश यास ३३३३ रुपये, स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र, तृतीय क्रमांक विष्णू मोकल हाशिवरे यांना प्रकल्पग्रस्त या देखाव्यास २२२२ रुपये, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र; चतुर्थ क्रमांक भाग्येश म्हात्रे केतकीचामळा यांच्या स्वामी समर्थ देखाव्यास ११११ रुपये, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व पाचवा क्रमांक संजय म्हात्रे रांजणखर यांनी अलिबागकरांचे रेल्वेचे स्वप्न यास ११११ रुपये स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र असे दिले गेले. उत्तेजनार्थ स्वप्निल ठाकूर हाशीवरे गायमुख व मंदिर, हर्षिता सुनील पाटील मांडवखार कोळीवाड्यातील गणेश, दीपक पाटील भायमळा केदारनाथ, तर विशेष पारितोषिक म्हणून योगेश पाटील खिडकी पंढरीची वारी, रवींद्र पाटील बहिरीचापाडा कुलाबा किल्ला निलेश कडवे सारळ निसर्ग चित्र यांची निवड झाली. स्पर्धेचे परीक्षक म्हणून जे जे ऑफ आर्ट स्कूलचे राजेश मेहत्रे, लहू पाटील, रत्नाकर पाटील यांनी काम पाहिले.

विजयी स्पर्धकांना राष्ट्रवादी काँग्रेस अलिबाग मुरुड विधानसभा मतदारसंघ प्रमुख अमित नाईक, पेढाबे सरपंच रसिका पाटील, प्रवीण पाटील, अमरनाथ पाटील, द.वि. धोदरे, संजय म्हात्रे, अल्पेश पाटील, मयूर पाटील यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

## आविष्कार फाउंडेशनचा पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावात आविष्कार फाउंडेशनचा पुरस्कार वितरण सोहळा कुणबी भवन हॉलमध्ये नुकताच उत्साहात झाला.

या सोहळ्यात राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, परिवहन महामंडळाचे अध्यक्ष आमदार भरत गोगावले यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उद्योजक विजय मेथा हे होते. सर्व मान्यवरांनी पुरस्कारार्थींचे अभिनंदन केले.

सोहळ्यास फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष पत्रकार संजय पवार, दक्षिण रायगड जिल्हा राष्ट्रवादी कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, शिवसेना जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, तालुका राष्ट्रवादी अध्यक्ष काका नवगणे, कोकण विभागाचे संदीप नागे, रायगड जिल्हाध्यक्ष शंकर शिंदे, रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटना अध्यक्ष सोपान चांदे, सुवर्णा जाधव, शर्मिला सत्वे, विवा कॉलेजचे प्राचार्य विवेक ढेपे, शिक्षक हेमंत बारटक्के, शिक्षिका अपूर्वा जंगम आदींसह पुरस्कार्थी, नागरिक उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून संस्थेच्या नवीन पदाधिकाऱ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते निवडपत्र देऊन संस्थेचे जिल्हाध्यक्ष शंकर शिंदे यांची केंद्र प्रमुखपदी निवड झाल्याबद्दल, संघटक भालचंद्र खाडे यांचाही सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन हेमंत बारटक्के, अपूर्वा जंगम यांनी केले.

## राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियानांतर्गत प्रशिक्षण

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा पंचायत गणाचे राष्ट्रीय ग्रामस्वराज्य अभियानांतर्गत नागाव ग्रुप ग्रामपंचायत व पंचायत समिती अलिबाग यांचे संयुक्त विद्यमाने सरपंच, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य व इतर सर्व शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांचे गणस्तरीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

यामध्ये रेवदंडा पंचायत गणातील नागाव ग्रुप ग्रामपंचायत व रेवदंडा ग्रामपंचायतीचा सहभाग होता. प्रशिक्षण कार्यक्रमास अलिबाग बांधकाम विभाग कनिष्ठ अभियंता नूतन माने, पर्यवेक्षक समूह समन्वयक इच्छा नाईक यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले. या वेळी नागाव सरपंच हर्षदा मयेकर, रेवदंडा सरपंच प्रफुल्ल मोरे, नागाव उपसरपंच सुरेंद्र नागवेकर, रेवदंडा उपसरपंच मंदाताई बळी, नागाव ग्रामपंचायत अधिकारी श्वेता कदम, रेवदंडा अधिकारी समिर म्हात्रे, रेवदंडा सदस्य सुराराम माळी, तसेच सदस्य, कर्मचारी उपस्थित होते.



## ‘अमृत’च्या लक्षित गटातील युवकांना मिळणार एमकेसीएल संस्थेमार्फत संगणक कौशल्य विकास प्रशिक्षणाची सुवर्णसंधी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील युवकांना कोणताही विभाग, संस्था अथवा महामंडळ यांच्यामार्फत लाभ मिळत नाही अशा युवकांना संगणक कौशल्यात विकसित व प्रशिक्षित बनण्यासाठी आवश्यक कौशल्य, ज्ञान आणि पाठबळ देऊन त्यांना सक्षम करणे आणि उद्योगाभिमुख रोजगाराच्या आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून स्वावलंबनाला चालना देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. त्या अनुषंगाने १६ ऑगस्ट रोजी ‘अमृत’ आणि चएमकेसीएल यांच्यामध्ये महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला.

‘अमृत’च्या लक्षित गटातील जास्तीत जास्त तरुणांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन या वेळी करण्यात आले. या करारातंर्गत एमकेसीएलमार्फत राबविण्यात येणाऱ्या काही निवडक प्रशिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना निवड झाल्यावर लाभ देण्यात येईल. ‘अमृत’तर्फे प्रशिक्षणसाठी निवड झालेल्या युवकांना एमकेसीएलच्या नियमानुसार सुरुवातीस सुरक्षा शुल्क स्वतः भरावयाचे आहे. योजनेच्या पात्र लाभार्थींनी प्रशिक्षण पूर्ण केल्यावर त्या प्रशिक्षणचे शैक्षणिक शुल्क अमृत संस्थेमार्फत एमकेसीएल संस्थेस परस्पर दिले जाईल. यासंबंधी सर्व माहिती अमृतच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे. https://mkcl.org/amrutkalash.

अमृतच्या या योजनेंतर्गत बाम्हण, कायस्थ, गुजराथी, पटेल, राजपुत, मारवाडी, ठाकूर, वैश्य व इतर खुल्या प्रवर्गातील जातींच्या युवक युवतींना या संगणक प्रशिक्षणाचा लाभ घेता येणार आहे. न्यू पनवेलमधील शाहू इंस्टीट्यूट येथे अमृत कलशचे संगणक प्रशिक्षण उपलब्ध असून खुल्या प्रवर्गातील लक्षित गटातील जास्तीत जास्त युवक-युवतींनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन शाहू इन्स्टियूट (९३२४२४२९३२)चे संचालक जयंत भगत यांनी केले आहे.

# पहिल्या दिवशी पावसाचा लपंडाव

## कानपूर कसोटीत बांगलादेश दिवसाखेर ३ बाद १०७ धावा

**कानपूर : वृत्तसंस्था**

भारत आणि बांगलादेश यांच्यातील दुसऱ्या कसोटी सामन्यातील पहिला दिवस हा खेळाडूंपेक्षा पावसानेच गाजवल्याचे दिसून आले.



कानपूरच्या ग्रीन पार्कच्या मैदानात शुक्रवारी (दि. २७) सकाळी ९.३० वा. सामना सुरू होणे अपेक्षित होते, पण सामन्याआधी झालेल्या पावसामुळे मैदानात ओलावा असल्यामुळे शुक्रवारी जवळपास तासभर उशिराने सामना सुरू झाला. त्यानंतरही दिवसभराचा खेळ काही पूर्ण होऊ शकला नाही. बांगलादेशने तीन गडी गमावून १०७ धावा केल्या आहेत.

भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा याने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पाहुण्या संघाला झटपट बाद करण्याचा त्याचा डाव होता, पण खेळ थांबला त्या वेळी बांगलादेशच्या संघाने तीन विकेट्सच्या मोबदल्यात पहिल्या डावातील ३५ षटकांच्या खेळात धावफलकावर १०७ धावा लावल्या होत्या. मोमीनुल हक ८१ चेंडूंत ४० धावांवर नाबाद होता. दुसऱ्या बाजूला मुशफिकुर रहिम १३ चेंडूंत सहा धावांवर खेळत होता.

भारताकडून आकाश दीपने दोन विकेट्स घेतल्या. त्याने सलामीवीर झाकिर हसन ०(२४) आणि शादमान इस्लाम २४(३६) यांना तंबूचा रस्ता दाखवला. याशिवाय आर. अश्विन याने बांगलादेशचा कर्णधार शान्तो याची महत्त्वपूर्ण विकेट घेतली.

बांगलादेशच्या कर्णधाराने ५७ चेंडूंत ३१ धावा केल्या. या दोघांशिवाय जसप्रीत बुमराहन आणि मोहम्मद सिराज यांनी अनुक्रमे नऊ आणि सात षटके गोलंदाजी केली, पण त्यांना काही विकेट्सच खाते उघडता आले नाही.

भारत आणि बांगलादेश यांच्यातील दुसऱ्या कसोटी सामन्यातील ३५ षटकांच्या खेळात दोन्ही संघांनी बरोबरीने कामगिरी केली. भारतीय संघाच्या खात्यात आणखी दोन विकेट्स असत्या तर पहिला दिवसाच्या खेळात भारतीय संघ आघाडीवर राहिला असता, पण तीन विकेट गमावून शतकी धावसंख्या करत बांगलादेशच्या संघाने टीम इंडियाच्या बरोबरीने खेळ केला.

पहिल्या दिवसातील अधिक खेळ पावसामुळे वाया गेला. त्यामुळे दोन्ही संघांशिवाय पावसानेच दिवस गाजवला, असे म्हणता येईल. ढगाळ वातावरण, अंधूक प्रकाश अन् मग सुरू झालेला पाऊस खेळ वेळेआधीच थांबवण्यात आला.

# नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये रायगडच्या चार खेळाडूंची चमक



**नागोठणे : बातमीदार**

केरळ येथे झालेल्या ७७व्या नॅशनल एक्वोटिक चॅम्पियनशिप स्पर्धेत महाराष्ट्र संघाने १२ वर्षानंतर रौप्यपदक पटकाविले. या संघातून रायगड जिल्ह्यातील झोतिरपाडा बेणसे विभागातील खेळाडूंनी प्रतिनिधित्व करून चमक दाखवली.

रायगडातील रोहित कुथे, सार्थक इंद्रे, सर्वेश माने, दिनांशू कुथे व मुलींमध्ये राजश्री गुगले यांचा महाराष्ट्र संघात समावेश होता. हे सर्व खेळाडू रिलायन्स फाउंडेशनच्या नागोठणे हेल्थ क्लबमधील असून त्यांचे प्रशिक्षक सुनील पवार आहेत. यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन होत आहे.

# ‘सीकेटी’च्या दोन विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



रायगड जिल्हा कुस्ती असोसिएशनच्या वतीने खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) येथे रायगड जिल्हा निवड चाचणी कुस्ती आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत ग्रीको रोमन या प्रकारात सीकेटी उच्च माध्यमिक विद्यालयातील वेदांत विनोद नाईक आणि रूद्रनाथ सूर्यनाथ खवस (दोघेही बारावी सायन्स) या विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक प्राप्त केले. त्यामुळे त्यांची महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर असोसिएशन आयोजित राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत चिलठण हायस्कूलचे यश



**खोपोली : प्रतिनिधी**

श्री स्वामी समर्थ एज्युकेशन सोसायटीच्या खालापूर तालुक्यातील चिलठण हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत यश मिळवले आहे.

कुस्तीमध्ये १४ वर्ष गटात शार्दूल मंगेश नेमाने उपविजेता, १७ वर्ष गटात स्वराज शिवाजी श्रीखंडे उपविजेता, तर १४ वर्ष मुलींच्या खो-खो संघाने तृतीय क्रमांक प्राप्त केला. यशस्वी विद्यार्थ्यांचे सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष बळीराम पाटील यांनी अभिनंदन केले. सामाजिक कार्यकर्ते शंकर पाटील, मुख्याध्यापक, शिक्षक उपस्थित होते.

## लंकेच्या कामिंदू मेंडिसची ब्रॅडमन, हॅडलीशी बरोबरी

**गाले : वृत्तसंस्था**

कसोटी क्रिकेटमध्ये श्रीलंकेच्या कामिंदू मेंडिसची बॅट चांगलीच तळपत आहे. त्याने आठ कसोटी सामन्यांच्या १३ डावांत पाच शतके आणि चार अर्धशतके झळकावली आहेत. मेंडिसने अर्धशतकाच्या जोरावर एक नवा रेकॉर्ड केला आहे आणि आता शतक झळकावत त्याने सर डॉन ब्रॅडमन याच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे.

न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या पहिल्या डावात कामिंदू मेंडिसने शतक झळकावले. कसोटी क्रिकेटमध्ये सर्वात जलद पाच कसोटी शतके झळकावणारा तो आशियामधील पहिला फलंदाज ठरला आहे. त्याने यंदाच्या हंगामात जो रूटला मागे टाकून एकंदर कामगिरीत महान कसोटी फलंदाज डॉन ब्रॅडमन आणि जॉर्डन हॅडली यांची बरोबरी केली. त्यांनी १३ डावांत पाच शतके केली होती.

# बीओबी बॅडमिंटन स्पर्धेत स्वाती एस. विजेती

**मुंबई : प्रतिनिधी**

बँक ऑफ बडोदा मुंबई विभागीय बॅडमिंटन निवड चाचणी स्पर्धेमध्ये स्वाती एस. हिने महिला एकेरीचे विजेतेपद पटकाविले. दादर-पश्चिम येथील बीएसएनएल बॅडमिंटन कोर्टवरील महिलांच्या अंतिम सामन्यात स्वातीने १२-१२ अशा बरोबरीनंतर निर्णायक क्षणी अचूक फटके साधले आणि पूजा मोरेचे जोशपूर्ण आव्हान १५-१२ असे संपुष्टात आणून अजिंक्यपदावर शिक्कामोर्तब केले.



बँक ऑफ बडोदा मुंबई विभागतर्फे आयडियल स्पोर्ट्‌स अकॅडमी सहकार्याने झालेल्या महिला बॅडमिंटन स्पर्धेची उपांत्य लढतदेखील अटीतटीमध्ये रंगली. पहिल्या सलग चार गुणांसह डावाच्या मध्यापर्यंत ९-८ अशी आघाडी घेणाऱ्या गरिमा श्रीवास्तवला स्वाती एस. हिने अखेर २१-१३ असे चकवून अंतिम फेरी गाठली. दुसरी उपांत्य लढत जिंकताना पूजा मोरे हिने प्रियांका उपाध्यायचा २२-२० असा निसटता पराभव केला.

स्पर्धेमधून महिला विभागात स्वाती एस., पूजा मोरे, गरिमा श्रीवास्तव, प्रियांका उपाध्याय आणि पुरुष विभागात ऋषिकेश शिंदे, हनमंत सुद्रिक, प्रमोद जयस्वाल, ऋग्वेद फराडे यांची मुंबई विभागीय संघात निवड करण्यात आली असून हे सर्व खेळाडू १७ व १८ ऑक्टोबर रोजी राजकोट येथे होणाऱ्या अखिल भारतीय बीओबी बॅडमिंटन स्पर्धेमध्ये मुंबई विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

बँक ऑफ बडोदा क्रीडा विभागाचे प्रदीप सुरवसे व शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण यांनी विजेत्या-उपविजेत्यांचे अभिनंदन केले.

प्रशिक्षक सचिन भारती यांच्या मार्गदर्शनाखाली पंचाचे कामकाज सिद्धेश राऊत, आदित्य कीर, साहिल, चंद्रकांत करंगुटकर, ओमकार चव्हाण, अर्जुन कालेकर, श्रीधर नार्वेकर, अविनाश महाडिक आदींनी पाहिले.

## ब्राव्हो ‘केकेआर’चा नवा मार्गदर्शक

**कोलकाता : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२५च्या हंगामापूर्वी अनेक संघांमध्ये बदल होताना पाहायला मिळत आहे. केकेआर म्हणजेच कोलकाता नाइट रायडर्सने गौतम गंभीरच्या जागी आपल्या नवीन मार्गदर्शकाची घोषणा केली आहे. वेस्ट इंडिजच्या सर्वोत्तम खेळाडूंपैकी एक असलेला ड्वेन ब्राव्हो आता त्यांचा आता नवा मार्गदर्शक असेल.

ब्राव्हो हा मुंबई इंडियन्स आणि सीएसके या दोन्ही संघांसाठी खेळलेला खेळाडू आहे. सीएसकेसाठी आयपीएल जिंकणाऱ्या खेळाडूंमध्ये त्याची गणना होते. २०११पासून तो सतत सीएसकेसोबत दिसत होता, पण आगामी सीझनमध्ये तो केकेआरच्या जर्सीमध्ये दिसणार आहे. ब्राव्होने नुकतीच सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून आणि टी-२० लीगमधून निवृत्ती जाहीर केली आहे. यानंतर केकेआरने ही मोठी घोषणा केली.

# माझी माऊली चषक मोफत शालेय कॅरम स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

सार्वजनिक नवरात्र महोत्सव मंडळ-जेजे व आयडियल स्पोर्ट्‌स अकॅडमीतर्फे आंतरशालेय १६ वर्षाखालील मुलांची विनाशुल्क कॅरम स्पर्धा ३ ते ११ ऑक्टोबरदरम्यान दैवत रंगमंच, जे.जे. हॉस्पिटल कंपाऊंड, भायखळा-पूर्व येथे आयोजित करण्यात आली आहे.

विजेत्या-उपविजेत्यांना एकूण १६ आकर्षक चषक-मेडल पुरस्कार दिले जाणार असल्याची माहिती नवरात्र महोत्सव मंडळाचे सरचिटणीस भूषण परुळेकर यांनी दिली.

शालेय मुख्य कॅरम स्पर्धे अगोदर मुंबई व इतर जिल्ह्यातील शालेय खेळाडूंना स्पर्धात्मक सराव मिळण्यासाठी यंदा देखील २४वी शालेय कॅरम स्पर्धा भरविण्यात आली आहे. सबज्युनिअर कॅरमपटूंना प्रोत्साहन देण्यासाठी चॅम्पियन कॅरम बोर्डावर दर्जेदार स्पर्धेचे पूर्णपणे मोफत आयोजन करण्यात येणार आहे.

स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या शालेय खेळाडूंनी प्रवेश अर्जासाठी अथवा अधिक माहितीसाठी संयोजक लीलाधर चव्हाण अथवा मंडळाचे कार्यवाह चंद्रकांत करंगुटकर (९९८७८३१६२२) यांच्याकडे २९ सप्टेंबरपर्यंत संपर्क साधण्याचे आवाहन मंडळाचे अध्यक्ष कृष्णा रेणोसे यांनी केले आहे.




कर्जत : चांधई येथील दिनेश शिनारे यांच्या निवासस्थानी विराजमान २१ दिवसांच्या बाप्पाचे दर्शन युवा उद्योजक नितीन बडेकर, अजित जाधव यांनी घेतले.












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com